

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

चंद्राला चंदन देवाला वंदन,
भाऊ बहीनीचं प्रेम म्हणजे..रक्षाबंधन
रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा
–संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०५ | शनिवार, दि.९ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### सरकारने लोकसभेत आयकर विधेयक २०२५ मागे घेतले

नवी दिल्ली–केंद्र सरकारने शुक्रवारी लोकसभेत आयकर विधेयक, २०२५मागे घेतले. बिहारमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरावृत्तीच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी निवड समितीच्या अहवालानुसार आयकर विधेयक, २०२५ मागे घेण्याची परवानगी मागितली आहे.

### लाडक्या बहिणींना २१०० रूपये कधी मिळणार?

मुंबई–लाडकी बहीण योजनेच्या वाढीव रकमेसंदर्भात मंत्री आदिती तटकरेंनी देखील भाष्य केले आहे. 'लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० ऐवजी २१०० रूपये देण्याचा निर्णय शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, मंत्रिमंडळ घेतील, असे तटकरेंनी म्हटले आहे.

### सगळे राजकारणी बोगस आहेत–एकनाथ शिंदे

मुंबई–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकताच माध्यमाशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी, 'विचार पुढे, लाचार मागे असणार. बोलबच्चन आहेत नुसते हे लोक, सगळे राजकारणी बोगस आहेत खरंच' असे म्हटले आहे.

### मुंडेंचे दहशतीचे राजकारण आता संपले– दमानिया

मुंबई–धनंजय मुंडेंचे दहशतीचा राजकारण आता संपले असे ट्वीट मी काल केले आणि त्याचे कारण असे की बीडमध्ये पालकमंत्री अजित पवार गेले असताना तिथे धनंजय मुंडे कुठेही दिसले नाही हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा भाषणात अजित पवार म्हणतात की इथे कोणाचे बड्या बापाचा बेटा असला तरी सुद्धा त्याच्यावर कारवाई होईल. तिसरा डायलॉग त्यांचा की आका असो काका असो सगळ्यांवर कारवाई होईल, असे त्या म्हणाल्या.

### खालिद का शिवाजी चित्रपटावर एक महिन्याची बंदी


मुंबई–खालिद का शिवाजी या चित्रपटाचे प्रदर्शन महिन्याभरासाठी पुढे ढकलण्यात आले आहे. सिनेमाच्या प्रदर्शनाला एका महिन्यासाठी स्थगिती देण्यात आली आहे.

### धान्यावर आधारित मद्यनिर्मिती प्रकल्पाला मंजुरी

मुंबई : धान्यावर आधारित 'राज्य निर्मित मद्य' प्रकारला उद्पादन शुल्क विभागाने मंजुरी दिली आहे. यामुळे बंद पडण्याच्या अवस्थेतील विदेशी मद्याचे उत्पादन घेणाऱ्या १६ स्थानिक उद्योगांना नवसंजिवनी मिळणार आहे. महाराष्ट्र निर्मित मद्याचा हा नवा प्रकार धान्यावर आधारित असणार आहे. महाराष्ट्राचे रहिवाशी असणाऱ्या आणि विदेशी गुंतणूक नसलेल्या राज्यातील उद्योजकांना या नव्या मद्य प्रकाराचे उत्पादन घेता येणार आहे.

# शेतकरी कर्जमाफीसाठी निवडणुकीवर बहिष्कार

## बच्चू कडू यांचा निर्णय; धर्माच्या आधारावर तरुणांमध्ये फूट पाडली जाणार



पुणे । प्रतिनिधी

**कर्जमाफी द्यावी व शेतकरी विभागला जाऊ नये, यासाठी येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रहार पक्ष बहिष्कार टाकेल, अशी घोषणा संघटनेचे अध्यक्ष व माजी आमदार बच्चू कडू यांनी केली. जात, धर्माच्या आधारावर तरुणांमध्ये फूट पाडली जाईल, मतांसाठी विरोध होईल, या कारणामुळेच या निवडणुका लढण्याची गरज नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुण्यात शुक्रवारी आयोजित शेतकरी हक्क परिषदेत ते बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, आमदार कैलास पाटील, बाळासाहेब देशमुख, शेतकरी नेते अजित नवले, अनिल घनवट, पत्रकार रमेश जाधव उपस्थित होते. डिसेंबर दरम्यान होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा बच्चू कडू यांचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. पुण्यात झालेल्या शेतकरी हक्क परिषदेत या संदर्भात कडू यांनी घेतलेली भूमिका राजू शेट्टी यांनी मात्र पुढील बैठकीत विचार करूनच मांडू असे स्पष्ट केले. मात्र, त्यावर कडू यांनी आपली वैयक्तिक भूमिका असल्याचे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. बच्चू कडू म्हणाले, निवडणुकांपूर्वी महायुतीने शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू, अशी घोषणा केली होती.

पान २ वर

### शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणार

शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्यात येणाऱ्या लढाई शेतकऱ्यांची मते विभागली जाऊ नयेत. त्यामुळेच या निवडणुकांवर बहिष्कार टाकावा का, असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना विचारला. त्यावर कार्यकर्त्यांनी होकार देत त्याला सहमती दर्शवली. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जात, धर्मावरच प्रचार केला जाणार आहे, असेही ते म्हणाले.



## ऑगस्टच्या मध्यापासून पाऊस परतणार

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईमध्ये बुधवार रात्रीपासून पावसाचे प्रमाण वाढले असून याचा परिणाम गुरुवारी कमाल तापमानावर दिसून आला. गुरुवारी सकाळपासूनच मुंबईमध्ये पावसाची संततधार राहिली आणि आता शुक्रवारपासून अनेक दिवसांनंतर मुंबईकरांनी पुन्हा पावसाळ्यासारखा पाऊस अनुभवल्याने तापमानातही घट झाली. सांताक्रूझ येथे गुरुवारी ३०.५, तर कुलाबा येथे २८.७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.**

गुरुवार सकाळी ८ वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये कुलाबा येथे १०.२, तर सांताक्रूझ येथे ३५.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यानंतरही गुरुवारी दुपारपर्यंत पावसाची झड कायम होती. कुलाबा येथे दिवसभरात ०.८, तर

पान २ वर

## केज पोलिसांनी ट्रकसह एक कोटींचा गुटखा पकडला



केज । प्रतिनिधी

राज्यात गुटखा बंदी असतानाही मोठ्याप्रमाणात गुटख्याची वाहतूक आणि विक्री होताना दिसत आहे मागील आठ दिवसापूर्वी नेकनूर पोलिसांनी चौसाळा नजीक गुटख्याचा पिकअप पकडला होता त्यातच आज केज जवळ पोलिसांनी ट्रकसह एक कोटी रुपयांचा गुटखा पकडला या प्रकरणी चार आरोपीविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल

पान २ वर

# भेटीचा क्षण अन् एसपींच्या डोळ्यात अश्रू

## पोलिसांमुळे आठ वर्षांनी झाली आई मुलाची गाठ

बीड । प्रतिनिधी

**२०१७ मध्ये, केवळ १६ वर्षांचा असताना घराबाहेर पडला त्यामुळे वर्षानुवर्षे पालकांच्या डोळ्यांत आशेचा दिवा मंदावला आईवडील मनोमन मान्य करू लागले की त्यांचा मुलगा कदाचित या जगात नाही पण बीड पोलिसांच्या अथक शोधमोहीमेने अखेर चमत्कार घडवला! आज, ८ वर्षांनंतर तो हरवलेला मुलगा आपल्या आईवडिलांच्या मिठीत परत आला.आईच्या डोळ्यात अश्रू, वडिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि सगळीकडे फक्त एकच भावना आपलं लेकरू परत आलं आणि ते केवळ पोलिसांच्या कार्यतत्परतेमुळं ज्यावेळी आई आपल्या लेकराला मिठी मारली त्यावेळी पोलीस अधीक्षकांच्या डोळ्यातून नकळत अश्रू वाहू लागले.**





पिंपळेनर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अल्पवयीन मुलगा राजु काकासाहेब माळी वय १६ वर्ष (२०१७ चे वय) हा घरातून निघून गेला होता.तशी मिसिंग तक्रार होती राजु हा दहावीचे शिक्षण घेण्यासाठी संगमेश्वर विद्यालय नाळवंडी येथे शिकायला होता .

पान २ वर

# अंबाजोगाईत पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन करा; खा. सोनवणेंचा केंद्राकडे आग्रह

## केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेवून केली मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई परिसरातील नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे यांसारख्या दूरवरच्या शहरांमध्ये जावे लागते. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य राजे सिंधिया यांची दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन करण्याचा आग्रह केला आहे.

पान २ वर



# अल्पसंख्यांक भवनसाठी अजित पवारांचा हिरवा कंदिल

## शेख तय्यब यांच्या मागणीची घेतली दखल; पुढच्या दौऱ्यात जागा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांसाठी बीडमध्ये अल्पसंख्यांक भवन उभारण्यासाठी मंजुरी व निधी देण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन अल्पसंख्यांक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य शेख तय्यब यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना दिले. त्यावेळी तात्काळ या प्रस्तावास होकार देत पुढील दौऱ्यात अल्पसंख्यांक भवन उभारणीसाठी आवश्यक जागेची पाहणी करू, असे आश्वासन दिले.



अल्पसंख्यांक भवन उभारले गेले तर एका छताखाली अल्पसंख्यांक समाजाचे विविध कार्यालये यावीत आणि लोकांची कामे एका चक्करमध्ये पुर्णत्वाकडे

पान २ वर


छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352
महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारू, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या
नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638






**आष्टीः पाटोदा तालुक्यातील (धाटेवाडी) येथील बाळू केशव वायकर व त्यांच्या पत्नी लता बाळू वायकर हे दोघे पाटोदा येथे बाजारासाठी दुचाकीवरून जात असताना पाटोदा शहीद चौक येथे दुचाकी मोटार सायकलला एसटी महामंडळाच्या बस ने धडक दिल्याने वायकर पती–पत्नी जागीच ठार झाले होते त्यांच्या पाठीशी दोन चिमुकले लहान मुलावर दुःखाचा डोंगर कोसळला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेतून परमेश्वर येवले पाटील यांच्याकडून चिमुकल्या मुलांसाठी (एक लक्ष) १०००००/– लाख रुपयांची मदत देण्यात आली. या वेळी अशोक शिंदे, राहुल बप्पा शिंदे, बाबुराव बावणे,भरत आरसुळ, संग्राम आरसुळ आदि उपस्थित होते.**

## जिल्ह्याला मिळाले तीन नवे डीवायएसपी

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील बीड, केज, माजलगाव येथील उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) तिन्ही जागावर मागील काही महिन्यांपासून अधिकारी नव्हते, काल निघालेल्या आदेशात शासनाने या तिन्ही ठिकाणी डीवायसपींची नियुक्ती केली असल्याने आता कारभारात गती निर्माण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

बीड जिल्हा नेहमीच काही ना काही कारणाने चर्चेत असून, पोलीस प्रशासनावर काहीसा कामांचा ताण आहे. ही परिस्थिती असताना मागील काही महिन्यांपासून बीड, केज, माजलगाव येथील डीवायएसपी पदे रिक्त होती. यामुळे कारभाराची गती मंदावली होती. परंतु गुरुवारी (दि.७) शासनाने अनेक डीवायएसपींची नियुक्ती व बदल्यांचे आदेश काढले आहेत. यामध्ये बीड येथे माणिक विठ्ठलराव बेद्रे, केज शैलेश सुनील संखे तर माजलगाव येथे शैलेश सुधाकर गायकवाड यांची नियुक्ती केली आहे.

पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ७.०० क्विंटल | २,३४० | २,७४६ | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड : ५६.०० क्विंटल | २,०५० | २,६०१ | २,३८७ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,४०१ | २,७३० | २,६०० |
| मुग: २.५० क्विंटल | ६,४११ | ६,९१० | ६,६६० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ४,९०० | ६,१०१ | ५,५४६ |

# मराठा–ओबीसी दंगली घडल्यास फडणवीसच जबाबदार



## मनोज जरांगेंचा इशारा; मुंबईचा प्लॅन सांगितला

सातारा । प्रतिनिधि

मराठा आरक्षण हे ओबीसीमधूनच घेणार असून राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दंगल घडली तर त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार असतील, असा इशारा दिला आहे. मराठा समाजाच्या माध्यमातून २९ ऑगस्टला मुंबई चलोचा नारा देण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील हे पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. यावेळी ते बोलत होते.

मराठा आंदोलक आणि मराठा आरक्षणाचा लढा देणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आता पुन्हा एकदा मराठा

पान २ वर

## अग्रलेख

# दिल्लीत वाहताहेत लक्षवेधी वारे!

राजधानी दिल्लीत नेहमीच राजकीय घमासान सुरु असते, पक्ष पातळीवर, प्रादेशिक पातळीवर आणि राष्ट्र व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेहमीच काहीना काही हालचाली, कुजबुज, पवित्रे, लॉबींग दिसून येत असते. संसदेच्या अधिवेशन काळात हा पारा वाढलेला असतो. काही दिखावे असतात. काही कुरघोड्या असतात तर काही शह प्रतिशह असतात. जे सोईचे होईल ते केले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अचानक व पाठोपाठ घेतलेली भेट, स्वातंत्र्यदिन झेंडावंदनाचे वेध, उपराष्ट्रपती पदाची निवडणूक, ट्रंप यांचे टेरिफ आणि मनमानीचे चाळे हे जसे विषय आहेत तसे भाजपाच्या अजेंड्यावरचे काही महत्त्वाचे विषयही पेंडिंग आहेत पण पंतप्रधान व गृहमंत्री यांनी राष्ट्रपती मुर्मू यांची भेट कशासाठी घेतली हे कोडे अद्याप सुटलेले नाही. दरम्यान महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पाठोपाठ दिल्लीला जाणे आणि अमित शहा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटणे यामागे काहीतरी शिजते आहे. शिंदे यांना त्यांचे मंत्री अडचणीत आणत असले तरी त्यांच्या मनात खदखद आहेच. मंत्रीमंडळातील काही मंत्री उबाठा शिवसेनेशी मेतकुट जमवून आहेत हा जसा राग आहे तसा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका होऊपर्यंत सरकारमध्ये बदल नकोत, आगामी निवडणुका महायुती म्हणून लढूया पण आम्हाला स्पेस हवी, आदी बाबी त्यांना पंतप्रधान व गृहमंत्री यांच्या कानावर घालायच्या असाव्यात. त्यात चुकीचे काही नाही पण आम्ही राज्यात कुणाला मानत नाही आम्ही थेट पंतप्रधान मोदींशी बोलतो, हेपण दाखवायचे असावे. महाराष्ट्रात महायुतीत सगळे ऑल वेल नाही, असाही संदेश दिला गेला आहे. भाजपात सुरु असलेली मेगा भरती महाआघाडीच्या घटक पक्षांना डोकेदुखी झाली आहे. पण ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा बुरखा फाडण्यासाठी मोदींनी विरोधी खासदारांसह विविध पक्ष्यांचा सहभाग असलेली शिष्टमंडळे जगभर पाठवली आणि भारताची भूमिका मांडली. जगभरातून त्याचे कौतुक होत आहे. भाजपचे विरोधकही सरकारबद्दल बरे बोलू लागले आहेत. आणखी एक बदल म्हणजे भाजपचा शिवसेना ठाकरे गटाकडे आणि शिवसेनेचा भाजपकडे बघण्याचा, बोलण्याचा दृष्टीकोन थोडा बदलला आहे. यमुनेकाठी होत असलेले हे बदल सर्वांना सजग करत आहेत.

ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तीन दिवसांच्या दिल्ली मोहीमेवर गेले. संजय राऊत यांच्या निवासी डेरा ठोकून त्यांनी वेगवेगळे अंदाज घेतले असे दिसते आहे. शरद पवार यांनी आपल्या निवासस्थानी आघाडी घटक पक्षांसाठी प्रितीभोजन ठेवले. राहुल गांधींनी जेवणाचा जंगी बेत केला. पाठोपाठ राहुल गांधी यांनी भाजपा विरोधी आघाडीची बैठक बोलावली आणि सरकारसह निवडणूक आयोगाचाही पर्दाफाश करीत मतदाना संदर्भात महत्त्वपूर्ण दावे केले.

दुसरीकडे मराठीचा मुद्दा आणि ठाकरे ब्रँड व मुंबई महापालिका निवडणूक यासाठी राज - उद्धव हे एकमेकांना टाळी देणं असलं तरी काँग्रेसला राज ठाकरे उद्धव ठाकरे यांच्या सोबतची आघाडी अडचणीची ठरु शकते. राज ठाकरे यांना आघाडीत घेतले तर काँग्रेसची मतपेटी अडचणीत येणार हे उघड आहे. त्यामुळे दिल्लीतील हालचाली, राजकारणावर दीर्घकाळ परिणाम करणाऱ्या ठरणार आहेत. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका वर्षाअखेरीस होतील अशी चिन्हे आहेत. त्यामुळे चाचपणी होईल पण विषय थंड करून हाताळला जाईल असाही एक प्रवाह आहे. भाजप आणि उद्धव ठाकरे शिवसेनेचे खासदार, यांची जवळीक, शिवसेना खासदार चतुर्वेदी यांनी मोदी यांची घेतलेली भेट, भेटीचा फोटो समाजमाध्यमावर टाकणे यालाही अर्थ आहे व तो अर्थ शोधला जातो आहे पण त्यामुळे एकनाथ शिंदे थोडे अस्वस्थ दिसत आहेत. मोदींनी पाकिस्तानला मुहतोड करारी जवाब दिला त्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी व अमित शहा यांचा गृहमंत्री पदाचा विक्रम झाला म्हणून त्यांचे अभिनंदन करायला मी दिल्लीत गेलो होतो, असे शिंदे सांगत असले तरी ते औपचारिक कारण आहे. खरे कारण बेताल वागणारे, बोलणारे मंत्री आणि मंत्रीमंडळातील काहींना हटवा हा त्यांच्या संदर्भातील विषय आहे. अमेरिकेने ट्रंप टेरिफ व दंड वगैरे घोषणा करुन भारताची अर्थव्यवस्था डेड वगैरे म्हणण्यापर्यंत मजल मारली आहे. रिझर्व्ह बँक गव्हर्नर यांनी पत धोरणातून जो विश्वास व्यक्त केला आहे, तो ट्रंप यांच्या आरोपांना उत्तर देण्यास पुरेसा आहे. मोदी या उद्धट, उर्मटपणाला शब्दातून नव्हे कृतीने उत्तर देणार हे उघड आहे. भारताने अमेरिका वगळून जगभर निर्यात वाढीसाठी योजना आखली आहे. भारताची जनता तिचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व व भारताचे निर्णय अधिकार यावर कोणालाच दडपण आणता येणार नाही, दबाव टाकता येणार नाही व देशाच्या व देशवासीयांच्या हिताशी कोणतीच तडजोड करणार नाही अशी सरकारची स्वच्छ भूमिका आहे. मोदी चीनचा दौरा करत आहेत तर अजित डोबाल रशिया दौऱ्यावर आहेत. डोनाल्ड ट्रंप यांच्या उलटसुलट उड्या आणि आरोळ्या यामुळे जगात नवी समीकरणे आकारत आहेत. भारताचे हित आणि भूमिका महत्त्वपूर्ण असणार हे वेगळे सांगायला नको. नव्याने आकाराला येणारे संघटन, ट्रंम्प यांना धडा शिकवतील असे दिसते आहे. दिल्लीतील हा आठवडा अनेक अर्थांनी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. उपराष्ट्रपतीपदासाठी कुणाचे नाव पुढे येते. या नाव निवडीत राजकीय समीकरणे असतीलच पण रक्षाबंधनाला कोण कुणाला राखी बांधणार आणि बांधून घेणार हे बघावे लागेल. तूर्त म्हैस पाण्यात आहे. यमुनेला पूर आलेला आहे आणि दिल्लीतील वारे लक्षवेधी बनले आहे.

# विविध कल्याणकारी योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशिल-महसूल मंत्री बावनकुळे

जालना । प्रतिनिधी

**शासनाकडून सर्व घटकांना समान न्याय देण्यासाठी लोकाभिमुख आणि गतिमान शासन चालविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकरी, वंचित व सामान्य नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडविण्यासाठी विविध निर्णय घेण्यात येत आहे. तरी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. अंबड येथे महसूल सप्ताह-२०२५ चा जिल्हास्तरीय समारोप समारंभ कार्यक्रमात अंबड येथील मत्स्योदरी मंगल कार्यालयात इथे शुक्रवार दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांची प्रमुख उपस्थिती होती.**




महसूल मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शेतकरी व सामान्य जनतेची बरीचशी कामे मंडळ स्तरावर पुर्ण करण्यात आली आहेत. शासनाने लोकाभिमुख, पारदर्शी आणि कार्यक्षम भूमिका स्विकारली आहे. शासनाकडून विकसित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्यात येत असून वर्ष २०४७ पर्यंत सर्वोत्तम भारताचा संकल्प करण्यात आलेला आहे. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात कृषीपंप आहेत त्यांना पुढील ५ वर्षे विजेचे बिल येणार नाही. विजेचा दर प्रत्येक वर्षी १० टक्क्याने वाढत असतो परंतू महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून वर्ष-२०२९ मध्ये विजेचा दर केवळ ६ रुपये म्हणजे ५० टक्क्यावर आणला जाणार आहे. शैक्षणिक कागदपत्रासाठी आता स्टॅम्पपेपरची आवश्यकता नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणतेही प्रमाणपत्र काढतांना ही सुट देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत महाराष्ट्रात ३० लाख घरे दिली जाणार असून त्या सर्व घरकुलांना ५ ब्रास वाळु घरपोच मोफत दिली जाणार आहे. एम-सॅण्ड धोरणानूसार कृत्रिम वाळु निर्मितीसाठी एका जिल्ह्यात ५० क्रेशर देण्याचे नियोजन आहे. पुढील पाच वर्षात सर्व शासकीय बांधकामे ही कृत्रिम वाळुपासून बांधण्यात येतील. तसेच शेतकऱ्यांचा शेतरस्ता १२ फुटाच्या कमी असणार नाही याचे नियोजन करण्यात येत आहे. महसूल विभागातील नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांची केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रात फेसअॅपद्वारे हजेरी घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध लाभाच्या योजनेसाठी यापुढे आता अॅग्रिस्टॅक नोंदणी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, दि.१ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हाभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वृक्षलागवड, विविध दाखल्याचे वितरण, डिबीटीद्वारे लाभ, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे यासारखी कामे करण्यात आली. तसेच दि.१७ सप्टेंबर ते १८ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत जनसप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा प्रशासनाकडून मत्स्योदरी देवीच्या मंदिरासाठी ४० कोटी रुपयांचा प्रस्ताव पर्यटनमध्ये समावेशासाठी पाठविला आहे तो मंजूर करावा तसेच अंबड येथील पाणी पुरवठा योजना मार्गी लावावी, अशी आग्रही मागणी आमदार नारायण कुचे यांनी केली.यावेळी वर्षभरात उत्कृष्ट कार्य केलेले अधिकारी-कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसास धनादेशाचे वाटप करण्यात आले. स्वयंसहाय्यता बचतगटांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. स्व.गोपिनाथराव मुंडे सानुग्रह अनुदानाचे व राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेच्या लाभार्थींना लाभाचे वितरण करण्यात आले. दिव्यांगांना अत्योंदय शिधापत्रिकेचा लाभ तर प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्र तसेच भूमि अभिलेख विभागाकडून सनदीचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच पाणंद रस्ते प्रश्न मार्गी लावल्याबद्दल तहसीलदार विजय चव्हाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह जिल्ह्यातील महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी, नागरिक, शेतकरी, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीच्या ऐतिहासिक दर्गा नासर जंगवर भूमाफियांचा डोळा !

## पुरातत्व पुरावे पाडून अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न; पोलीस अधीक्षकांनी तातडीने संरक्षण द्यावे सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

**परळीतील ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे अस्तित्व धोक्यात आले आहे. भूमाफिया, स्थानिक अधिकारी व नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या संगनमताने पुरातत्व व ऐतिहासिक पुरावे पाडून ही देवस्थान मिळकत बळकावण्याचा घृणास्पद डाव रचला जात असल्याचा गंभीर आरोप तारिक-ए-इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केला आहे.**



नासर जंग दर्गा ही महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाअंतर्गत असलेली ऐतिहासिक देवस्थान असून, खिदमत माश म्हणून तब्बल १७८ एकर इनामी जमीन आहे. गेल्या काही वर्षांपासून या जमिनीवर स्थानिक भूमाफियांचा डोळा असून, बोगस फेरफार, अतिक्रमण आणि टोलेजंग इमारती बांधून जमीन बळकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सय्यद सलीम बापू यांनी याबाबत म्हटले आहे की, नगरपरिषद अधिकाऱ्यांनी भूमाफियांच्या संगनमताने दर्ग्याचे ऐतिहासिक पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. मी स्वतः मुख्याधिकारी व वक्फ मंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असून, जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांना चौकशीसाठी आदेश देण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. याबाबत त्यांनी पुढे इशारा दिला की, हा प्रकार गंभीर असून, यामागे भूमाफिया, तलाठी, मंडळ अधिकारी, तालुका निबंधक आणि नगरपरिषद यांचे संगनमत आहे. पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घालून दर्ग्याला संरक्षण द्यावे, अन्यथा कायदेशीर लढा देत तक्रार दाखल केली जाईल. या प्रकरणाने परळी शहरात खळबळ उडाली असून, ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाचे रक्षण होणार की भूमाफियांचा डाव सफल होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा भर पावसात आंदोलन

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील ग्रामपंचायत कामगारांनी आपल्या विविध मागण्यासाठी आज जिल्हा परिषदेवर मोर्चा काढला प्रामुख्याने हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयापासून जि. प.वर काढण्यात आला होता. आज झालेल्या पावसात हा मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जि.प.वर हा मोर्चा होता.**

ज्यातील सर्व ग्राम पंचायत कर्मचारी संघटनाने आपल्या विविध मागण्या साठी २४/७/२०२५ रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ग्राम विकास मंत्री जय कुमार गोरे मुख्य सचिव प्रधान सचिव यांना २० मे पासून आंदोलन करणया बाबत निवेदन दिले होते त्यानंतर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी मंत्रालया त १४ मे रोजी बैठक घेऊन आठ दिवसात अहवाल तयार करून एक महिन्यात मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते परंतु ते आज पर्यंत पूर्ण झाले नसल्याने ग्राम पंचायत कर्मचारी संघटनाने राज्य व्यापी आंदोलन सुरू करण्यात आले आहे. सदरील आंदोलना मध्ये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी च्या कार्यालये वर मोर्चा काढून व ग्रामविकास मंत्री यांचे लक्ष वेधण्यासाठी सातारा येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनअशा स्वरूपात करण्यात आले आहे मा. अभय यावलकर यांच्या शिफारशी लागू करा,५४ महिन्यापैकी फक्त एकोणीस महिन्याचा किमान वेतन वाढीचा फरक दिला असून उर्वरित ३५ महिन्याचा थकीत वेतन मिळावा, किमान वेतनची मुद्दत फेब्रुवारी २०२३ लाच संपलेली असून नवीन किमान वेतनासाठी समिती स्थापन करण्यात यावी, ग्रामीण कर्मचाऱ्यां च्या वेतनासाठी वसुली व उत्पन्न ही अट रद्द करण्यात यावी, लोकसंख्येच्या आकृतीबांधा ची जाचक अट रद्द करावी आशा विविध मागण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय कर्मचाऱ्यांने राज्य भरात आंदोलन सुरू आहे.

## पान १ वरून...

### ऑगस्टच्या मध्यापासून

सांताक्रूझ येथे ६.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सकाळी मुंबईत तुरळक ठिकाणी एखाद-दुसरी जोरदार सर आल्याने मुंबईमध्ये पावसाचा वेग वाढेल, अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र दुपारनंतर पावसाची जोर कमी झाला. उर्वरित महाराष्ट्रात मात्र फारसा पाऊस नव्हता. त्यामुळे उर्वरित महाराष्ट्रात कमाल तापमानाचा पारा चढा आहे. गुरुवारी मालेगाव येथे सरासरीपेक्षा तब्बल ६.३ अंशांनी कमाल तापमान अधिक होते. मालेगाव येथे ३५.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. हे तापमान बुधवारपेक्षा तीन अंशांनी अधिक होते. विदर्भामध्ये अकोला येथे राज्यातील सर्वाधिक कमाल तापमान गुरुवारी नोंदले गेले. अकोला येथे ३५.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची गुरुवारी नोंद झाली. हे तापमान सरासरीपेक्षा ५.९ अंशांनी अधिक होते, अमरावती येथेही कमाल तापमान ४.७ अंशांनी, यवतमाळ येथे सरासरीपेक्षा ६.१ अंशांनी अधिक होते. वातावरणातील उष्णतेमुळे तसेच वातावरणीय प्रणालीमुळे विदर्भामध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

--------

### शेतकरी कर्जमाफीसाठी

ती अद्यापही अमलात आणली नाही. शेतकऱ्यांनी यासाठी आंदोलन करू नये, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र, शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळायला हवी, तसेच शेतकरी विभागला जावू नये यासाठी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रहारच्या वतीने बहिष्कार टाकला जाईल, असा इशारा त्यांनी दिला. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी कडू यांनी यापूर्वी रायगड आणि मोझरी येथे आंदोलन केले होते. त्यानंतर राज्य सरकारकडून कर्जमाफीबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यावर अद्यापही निर्णय झालेला नाही. त्यानुसार राज्यातील वेगवेगळ्या शेतकरी संघटना पुण्यातील या शेतकरी हक्क परिषदेच्या निमित्ताने एकत्रित आल्या होत्या.

--------------

### भेटीचा क्षण अन एसपींच्या

त्याची राहण्याची सोय नसल्याने तो शिक्षक ज्ञानेश्वर राऊत यांच्या घरी राहत होता. आईवडीलांची परिस्थिती एकदम हलाकीची होती . ते ऊसतोडी कामगार असल्याने कर्नाटक राज्यात कामासाठी गेले होते. डिसेंबर २०१७ मधे राजु हा शाळा सुटल्यावर कोणाला काही एक न सांगता निघून गेला. याबाबत त्याच्या आई वडिलांना माहिती मिळाली तेव्हा त्यांना कर्नाटक वरून येण्यास आठ दिवस लागले. राजू चे आई वडिलांना वाटले की राजू काही दिवसात परत येईल, व ते दोघेही अशिक्षित असल्याने त्यांनी गुन्हा दाखल केला नाही. असे करत पाच ते सहा वर्ष निघून गेले. पण राजु परत आलाच नाही, मग २०२३ मधे त्याच्या आईने पोस्टे पिंपळनेर ला गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा जानेवारी २०२५ मधे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथक ला वर्ग झाला. पीएसआय पल्लवी जाधव यांनी राजूच्या आईवडिलांची भेट घेतली त्यांचे अश्रु आणि दुःख खूप वेदनादायक होते. त्यानंतर राजूच्या शाळेत जावून त्याचे शिक्षकांची ही भेट घेतली व त्याच्या बाबत माहिती घेतली पीएसआय पल्लवी जाधव यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेवून गुन्ह्याबाबत सर्व माहिती सांगितली व सदर शिक्षकावर संशय असले बाबत ही सांगितले. सरांनी सांगितले की तुम्ही पुढील तपासात एलसीबीची मदत घ्या. व तसा आदेश त्यांनी पोनी शिवाजी बंटेवाड एलसीबी यांना दिला. पोनी बंटेवाड यांनी पीएसआय पल्लवी जाधव यांच्या मदतीसाठी पीएसआय श्रीराम खटावकर यांना आदेश दिला. त्यानंतर दोघांनी मिळून तपास सुरू केला. सदर शिक्षकाकडून काही एक माहिती मिळाली नाही. त्यानंतर पीएसआय खटावकर यांनी टेक्नीकल टीम च्या मदतीने राजू ची माहिती काढली. सदर माहितीवरून राजूचे लोकेशन पुणे येथे असल्याचे समजले. व त्याला शोधून विश्वासात घेवून पुणे वरून बीड ला आणले.आज रोजी सकाळी पीएसआय खटावकर यांनी राजू ला पुढील तपासकामी पीएसआय पल्लवी जाधव यांच्या ताब्यात दिले.त्यानंतर त्यास पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या समोर हजर केले. त्यावेळी तिथे राजूचे आई वडील ही हजर होते. त्यांच्यासाठी ही विशेष भेट पोलीस अधीक्षक ,अतिरीक्त पोलीस अधीक्षक यांनी घडवून आणली त्यावेळीच क्षण म्हणजे चक्क पोलीस अधीक्षकांच्या डोक्यात अश्रू आले होते.

--------------

### केज पोलिसांनी ट्रकसह एक

करण्यात आला असून गुटख्याचा ट्रक जप्त केला आहे. दि. ७ ऑगस्ट रोजी मध्यप्रदेशातून केज मार्गे कळंब जि. धाराशिवकडे गुटखा घेऊन एक ट्रक केजच्या दिशेने येत असल्याची माहिती केज पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी त्यांच्या पथकाला ट्रक क्र. (डी डी-०२/एस-९४४२) ताब्यात घेण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी तो ट्रक ताब्यात घेण्यासाठी सापळा लावला. सदर ट्रक छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भरधाव वेगात कळंबच्या दिशेने वळविण्यात आला. सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, पोलिस कॉन्स्टेबल शिवाजी कागदे, हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने, पोलिस कॉन्स्टेबल हनुमान मुंडे, पोलिस कॉन्स्टेबल शमीम पाशा, वाहन चालक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शंभुदेव दराडे यांनी पाठलाग करून केज पासून दीड कि. मी. अंतरावर या भरधाव वेगातील ट्रकला पोलिसांनी ओव्हरटेक करून कळंब रोडवर असलेल्या कमल पेट्रोलियम पेट्रोल पंपा जवळ पोलिस गाडी आडवी लावून ट्रक थांबवला. पोलिसांनी इशारा करून ट्रक थांबताच ट्रक ड्रायव्हर शेजारी बसलेला एक इसम परशुराम मोहन गायकवाड, हा ट्रक मधून उडी मारून एका शेतात पळून गेले. त्यांच्या मागे चिखल तुडवत आणि काट्या-कुट्यातून पोलिस फिल्मी स्टाईलने पाठलाग करीत असताना त्यांनी गुंगारा देऊन उसाच्या शेतात जाऊन लपून बसला होता. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने अशी माहिती दिली की, जालीमसिंग (रा. बुऱ्हाणपूर, ता. जि. बुरहानपूर, मध्यप्रदेश) याने हा गुटखा इंदौर येथुन ट्रक मध्ये भरुन दिला. तो गुटखा धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील व्यापारी रुपेश मालपाणी रा. कळंब जि धाराशिव यांना पोहोच करायचा होता. अशी माहिती त्यांनी दिली. केज पोलिसांनी रईसोयीन अमीरोद्दीन शेख, वय (५९ वर्षे), (रा. मील्लतनगर, ओकाला रोड, ता. जि. रतलाम, मध्यप्रदेश), परशुराम मोहन गायकवाड, वय (२२ वर्षे), (रा. एकनाथवाडी, ता. पाथर्डी, जि अहिल्यानगर ह. मु. बीड), या दोघांना ताब्यात घेऊन सदर ट्रक पोलिस ठाण्यात आणला. त्या ट्रकची पंचा समक्ष झडती घेतली असता त्या ट्रकमध्ये असलेल्या ७४ लाख ५२ हजार रु. च्या गुटख्यासह १ कोटी १ लाख ५४ हजार रु. चा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

----------------

### अल्पसंख्यांक भवनसाठी अजित

जावीत यासाठी अल्पसंख्यांक मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे सदस्य शेख तय्यब यांनी पालकमंत्री अजित पवार हे बीड दौऱ्यावर असताना अल्पसंख्यांक भवनसह इतर मागण्यांचे निवेदन देऊन जागा उपलब्ध करण्याची मागणी केली. तसेच समाजाच्या विकासासाठी हे भवन किती महत्वाचे आहे, हे सांगितले. सध्या अल्पसंख्यांक समाजाचे विविध कार्यालये आणि संस्था वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेल्या स्थितीत कार्यरत आहेत. यामुळे नागरिकांना सेवांचा लाभ घेण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागतो. त्यामुळे बीड शहरात एक स्वतंत्र अल्पसंख्यांक भवन उभारण्यात यावे, हे भवन उभारण्यासाठी आवश्यक जागा आम्ही स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देऊ, असे शेख तय्यब यांनी निवेदनात म्हटले. निवेदन वाचल्यानंतर अजितदादांनी या प्रस्तावास सकारात्मकतेने घेत होकार दिला आणि पुढील दौर्यात या विषयी जागेची पाहणी करू, असे म्हटले. हे भवन उभारण्यात आले तर यामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे कार्यालय, महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे कार्यालय, उर्दू घर, हज किमिटीचे कार्यालय, जिल्ह्यातील अल्पसंख्यांक कार्यालये एका छताखाली येतील आणि लोकांच्या समस्या संपुष्टात येतील. दादा म्हणाले, राजुरीवेसचा रस्ता लवकरच होईल मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी गेल्या दोन महिन्यांपूर्वी बीड शहरातील राजूरीवेस ते बलभीम चौक सिमेंट रस्ता, नाली बांधकाम आणि डॉ. झाकेर हुसैन मदरसा योजना अल्पसंख्यांक विभागामार्फत बीड जिल्ह्यातील मदरश्यांमध्ये जिल्हा नियोजनच्या माध्यमातून सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्याबाबत निवेदन दिले होते. जिल्हा परिषद ते राजूरीवेस आणि राजुरीवेस ते बलभीम चौक हा रस्ता लवकरच केला जाईल. त्याचबरोबर मदरश्यांमध्ये सौरऊर्जा संच बसवण्याबाबतही अजितदादांनी सकारात्मतेने घेत ही दोन्ही कामे लवकर पुर्णत्वाकडे जातील, असे आश्वासन शेख तय्यब यांना दिले.

----------------

### अंबाजोगाईत पासपोर्ट सेवा

मागणीचे पत्रही केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आले. अंबाजोगाई ही शैक्षणिक, आरोग्य आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर आहे. याठिकाणी अनेक शहरे आणि ग्रामीण भागाचा संबंध येतो. अंबाजोगाई याठिकाणी पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन केल्यास परिसरातील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे. परिसरासोबतच केज, धारूर, परळी, माजलगाव आदी भागातील नागरिकांचाही मोठा वेळ वाचेल आणि कामेही वेळेत होतील. सद्यस्थितीत अंबाजोगाई सारख्या शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांचीही पासपोर्ट सुविधा घेण्यासाठी धावपळ सुरू असल्याचे दिसते. परंतु त्यांना ही प्रक्रिया करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. इतकेच काय पासपोर्ट काढण्यासाठी अनेकदा चकराही माराव्या लागतात. अंबाजोगाईतून इतर ठिकाणी जाण्याचा खर्च आणि यात वेळही खर्चही होत आहे. यामुळे अंबाजोगाईत पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र स्थापन करण्याचा आग्रह खा.बजरंग सोनवणे यांचा आहे. हा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी त्यांनी केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य राजे सिंधिया यांची दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी सिंधीया यांनी त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे आपल्या पाठपुराव्याने लवकरच ही सुविधा अंबाजोगाईत सुरू होईल, अशी मला खात्री आहे, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली आहे.

------------

### जिल्ह्याला मिळाले

जिल्ह्यातील या तीन ही उपविभागीय पोलीस अधिकारी यांची नियुक्ती झाल्याने आता कामांना गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

--------------

### मराठा-ओबीसी दंगली घडल्यास

आरक्षणासाठीचा लढा उभारला जाणार आहे. त्यासाठी, मुंबईत २९ ऑगस्टला राज्यभरातून मराठा बांधवांना येण्याचं आवाहनही मनोज जरांगे यांनी केले आहे. येत्या, २९ ऑगस्ट रोजी आरक्षणाचा तुकडा पाडणार, आरक्षण घेणार ते पण ओबीसीतूनच. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दंगल घडली तर त्याला जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असतील, अशा शब्दात जरांगे पाटलांनी राज्य सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे. देवेंद्र फडणवीस हे ओबीसींसाठी लढणार असतील, तर ते मराठ्यांसाठी लढणार नाहीत असाच त्याचा अर्थ होतो, असेही जरांगेंनी म्हटले.

**नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?**

मराठा आणि ओबीसी दंगल घडवण्याचा खटाटोप सुरू आहे. मात्र, आमच्यात असं होणार नाही. याउलट दोन्ही समाज एकत्र येऊन फडणवीस यांना अद्दल घडवतील. मराठा आरक्षणाचा प्रश्न बाजूला ठेवून सर्व ओबीसी बांधवांना गोव्याला बोलावले जाते आणि मराठ्यांच्या विरोधात कान भरले जातात. ओबीसी आणि मराठामध्ये दंगल घडली तर याला जबाबदार देवेंद्र फडणवीस राहतील, याचा फटका केंद्रातील सरकारला देखील बसणार आहे, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे.

----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ९ ऑगस्ट २०२५
३

# थोडक्यात....



## यशस्वी छात्राध्यापकांचा गौरव सोहळा उत्साहात साजरा

कळंब । प्रतिनिधी

धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेतून व प्राचार्य सतिश मातने यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे आयोजित वार्षिक परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. प्रथम वर्षात प्रीती रमेश महाद्? वार हिने ८४.००% गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला.तसेच साक्षी संतोषराव कवडे हिनेही ८०.६०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. द्वितीय वर्षात नेहा हरिश्चंद्र शिरसट हिने ८२.७५% गुण प्राप्त करत द्वितीय क्रमांक,तर साक्षी काकासाहेब वाघमारे ८०.२५% हिला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला. या यशस्वी छात्राध्यापकांचा दि.७ ऑगस्ट २०२५,गुरुवार रोजी विद्यालयात विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत प्राचार्य सतिश मातने,प्रा.श्रीकांत पवार, प्रा.सुकेशनी गव्हाणे,प्रा.मोहिनी शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अविनाश घोडके,भैरवनाथ आयटीआयचे प्राचार्य सुरज भांडे,निदेशक अविनाश म्हेत्रे, राजकुमार शिंदे,निदेशिका कोमल मगर, आदित्य गायकवाड,दिक्षा गायकवाड, विनोद कसबे व सर्व छात्राध्यापक उपस्थित होते.



## शिरूर तालुक्यात वृक्ष लागवड मोहीम जोरात

शिरूर । प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच नागरिक या मोहिमेची पूर्वतयारी अनेक दिवसापासून करीत होते.शिरूर कासार तालुक्यात आज ही वृक्ष लागवड मोहीम जोमात राबविण्यात आली. तहसील कार्यालय परिसर, दिवाणी न्यायालय परिसर, वनविभागाच्या जमीनी, शिक्षण विभागाच्या सर्व शाळा आणि महाविद्यालय, ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक मोकळ्या जागा तसेच रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, नगरपंचायतीच्या हद्दीतील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी स्मशानभूमीची जागा यासह खाजगी शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये तसेच घरासमोरील मोकळ्या जागेत मोठ्या उत्साहवर्धक वातावरणात ३० लक्ष वृक्ष लागवडीमध्ये प्रशासनाच्या जोडीस लोकप्रतिनिधी व नागरिक सहभागी झाले होते.यामध्ये वनविभाग ३२०००, सामाजिक वनीकरण ४५०००, नगरपंचायत १००००, रेशीम विभाग ५५००० शिक्षण विभाग १०,००० ग्रामपंचायत ५२००० इतके उद्दिष्ट देण्यात आले होते.

## टी.सी.हरवला आहे

दीक्षा माणिक डोंगरे जिल्हा परिषद प्रशाला चारधरी ता धारूर जिल्हा बीड इयत्ता सातवी पासचा टीसी माजलगाव धारूर बस प्रवासात हरवला आहे सापडल्यास

**संपर्क ८००७४ ५६४७४**

## सुरूमगावात तीनशे झाडांचे वृक्षारोपण

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुरूमगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावातील जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय,हनुमान मंदिर परिसर व रोडच्या दोन्ही बाजुने तीनशे झाडांचे वृक्षारोपण गुरूवार रोजी करण्यात आले. चिंच,आवळा,वड, अशोक,करंजी, पारिजातक,लिंब या अशा अनेक झाडांचे वृक्षारोपण गावातील ग्रामस्थांच्या हस्ते परिसरात करण्यात आले.झांडाच्या संगोपनासाठी सर्वांनी यावेळी संकल्प केला.यावेळी सरपंच शिवकुमार माने, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब खराडे, दिपक माने, नारायण माने, रामभाऊ माने, साहेबराव वाव्हळ,मोतीराम खराडे,उत्तम वाव्हळ,गजानन गुळभिले,भगवान वाव्हळ यांची उपस्थिती होती.

# सरपंच परिषदेच्या प्रश्नावर मंत्रालयातील बैठकीत अनेक निर्णय मार्गी

## सरपंचांसाठी गावांच्या विकासाची संधी–ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

आष्टी । प्रतिनिधी

राज्यात १७ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कालावधीत गावाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण काम करण्याची सरपंचांना संधी असून सरपंचांनी या अभियानातून महत्त्वपूर्ण योगदान द्यावे, असे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. सरपंच परिषदेच्या विविध मागण्यांबाबत ग्रामविकास मंत्री श्री गोरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे आणि पदाधिकारी उपस्थित होते.ग्रामविकास मंत्री म्हणाले, गावांच्या विकासासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. अभियान कालावधीत गावातील आवास योजनेतील घरकुल उद्दिष्ट पूर्ण करणे, ग्रामस्वच्छता, सुंदर शाळा, बचत गटांचे सक्षमीकरण, सौर ऊर्जा वापर वाढवणे व महिला सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे अशा कामांच्या माध्यमातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातून गावांमध्ये विकासासाठी चांगले काम केले जावे, असे आवाहन केले.

महा–ई–सेवा केंद्राच्या देण्यात येणाऱ्या सेवा व दाखल्यांच्या शुल्कापोटी जमा होणारा निधीतून ग्रामपंचायतीच्या निधी व्यतिरिक्त शासन शासन शुल्क व संबंधित सेवा केंद्र परिचालकाचे



सेवाशुल्क याचा समावेश आहे. राज्यातील सर्व गावांमध्ये ग्रामपंचायतच्या अंतर्गत महा–ई–सेवा केंद्र कार्यरत असून या मार्फत ३४२ दाखले व सेवा दिल्या जातात. याचे शुल्कापोटी जन्म होणाऱ्या निधीपैकी ३० टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर वापरण्यास परवानगी देण्यात आली असून यातून विविध कामे केली जावी असे मंत्री श्री गोरे म्हणाले. सरपंच परिषदेचे १६हजार ५०० सरपंच सदस्य आहेत. राज्यस्तरीय सरपंच अधिवेशन २०२० साले शिर्डी येथे झाले होते यावेळी विविध मागण्यांबाबत दिलेल्या आश्वासन पूर्ती करण्याबाबत यांच्या प्रमुख वीस मागण्या बाबत हाच बैठकीत चर्चा करण्यात आले.

राज्यातील विविध गावातून आलेल्या सरपंच उपस्थिती

सरपंचांनी आपल्या विविध अडचणी व समस्या मांडल्या, बैठकीसाठी सरपंच राजाराम पोतनीस,प्रदेश सरचिटणीस, आनंद जाधव प्रदेश कोशाध्यक्ष,किसन जाधव राज्य विश्वस्त,आबासाहेब सोनवणे ( राज्य कोअर कमिटी अध्यक्ष)जिजाभाऊ टेमगिरे (राज्य कोअर कमिटी उपाध्यक्ष) शत्रुघ्न धनवडे (सातारा जिल्हा सचिव), जी. एम. पाटील (कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष), प्रियांका जाधव (आजरा तालुका अध्यक्ष) मनोहर पोखरकर, आंबादास गुजर, तान्हाजी गायकर, समाधान बोडखे, राजमल भागवत, शेखर रानवडे, महेंद्र बोरसे, प्रमोद चौधरी, स्वरा पाटील, सुषमा देसले, संदीप पाटील, कुंडलिक कोहिणकर, वैशाली रोमन, आश्विनीताई थोरात, निकिता रानवडे उपस्थित होते.

विविध मागण्यांबाबत चर्चा

यावेळी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे आष्टी प्रतिनिधी मंत्री महोदय व ग्रामविकासाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर काही मागण्या केल्या त्यात नवी मुंबई येथे सर्व सुविधा युक्त सरपंच भवनाची निर्मिती करण्यात यावी. खेडेगावात रोज ज्या कर्मचाऱ्यांशी शेतकरी, ग्रामस्थ यांचा सबंध येतो ते ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तलाठी यांना एकच गाव, सरपंच, उपसरपंच यांना एस. टी. (बस) प्रवास मोफत करण्यात यावा. वित्त आयोगाचा उपलब्ध निधी केवळ विकास आणि पायाभुत सुविधा यावर खर्च करण्यात यावा. सरपंचांना दरमहा सरसकट दहा हजार रूपये आणि उपसरंपच यांना तीन हजार तसेच सदस्यांनाही मानधन सुरू करण्यात यावे, आपले सरकार सेवा केंद्र ज्या कंपनीमार्फत चालवले जाते यातून मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायतीच्या आर्थिक शोषण होत आहेत ते तात्काळ थांबवावे व संगणक परिचालक यांना ग्रामपंचायतीचे कर्मचारी समजण्यात यावे, दुष्काळ पूर टंचाई रोगराई सर्पदंश यासारख्या संकटाचा सामना करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला दहा लक्ष रुपयापर्यंत आरक्षित निधी देण्यात यावा, ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्थेत येत असल्याने विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत सरपंच व सदस्यांना मतदानाचा अधिकार मिळावा, जिल्हा विकास व नियोजन समिती आणि तालुका व जिल्हास्तरीय शासकीय कमिटी मध्ये सरपंच प्रतिनिधी असावा, प्रत्येक महसूल विभागातून किमान एक तरी सरपंच प्रतिनिधी विधान परिषदेवर घेण्यात यावा, ग्रामपंचायत स्तरावर काम करत असताना वाढत्या लोकसंख्येमुळे सध्या गावात उपलब्ध असणारे गावठाण कमी पडत आहे जागेच्या वाटणीवरून व गावात वाद वाढल्या आहेत गोरगरिबांना घरकुल योजनेचा लाभ देता येत नाही त्यामुळे गावातील गायरान जमीन ही गावठाण वाढीसाठी देण्यात यावी तसेच गावच्या कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी सुद्धा जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, सरपंच बांधवांना देण्यात येणारे प्रशिक्षण हे स्व जिल्ह्यातच देण्यात यावे अन्य जिल्ह्यात त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवू नये यात महिला सरपंचांची मोठ्या प्रमाणात अडचण होत आहे यासह विविध मागण्यांबाबत चर्चा झाली

# रोटरी क्लब सेंट्रलचा पथदर्शी प्रकल्प


## हरित माजलगाव उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील पत्रकार संघाच्या संकल्पनेतून व रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या हरित माजलगाव या पथदर्शी प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या दोन किलोमीटरच्या पालखी मार्गावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून शहर हिरवेगार करण्याचा संकल्प या उपक्रमातून केला आहे.

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे सन २०२४/२५ चे अध्यक्ष रो.पांडुरंग चांडक,सेक्रेटरी रो. प्रभाकर शेटे, प्रोजेक्ट चेअरमन अंकुश राठोड आणि नारायण गंडे यांच्यासह नूतन अध्यक्ष रो.विनोद जाधव व सचिव रो. कैलास येलशेटे यांनी हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. लावण्यात आलेल्या झाडांना संरक्षण देण्यासाठी लोखंडी जाळ्यांचे ट्री–गार्ड बसवण्यात आले असून,पाण्याची योग्य व्यवस्थापण यामुळे ही सर्व झाडे वाचली असून चांगली वाढ झाल्याने लक्ष वेधून घेत आहेत.या उपक्रमाला मिळालेला लोकांचा सक्रिय सहभाग हेच त्याचे मुख्य यश आहे.माजी नगरसेवक शरद यादव यांनी उन्हाळ्याच्या दिवसांत टँकरने पाणी पुरवण्याचे महत्त्वाचे काम केले,ज्यामुळे लावलेली झाडे जगू शकली.याशिवाय ॲड.भानुदास डक,डॉ. शिनगारे,व्यापारी मित्र मंडळ, बसवेश्वर जयंती समिती,वीरशैव युवक संघ आणि ज्येष्ठ नागरिक संघ यांसारख्या विविध सामाजिक संस्था व व्यक्तींनीही या प्रकल्पासाठी मोलाचे सहकार्य केले.लोकसहभागा मुळेच सार्वजनिक कामे सोपी होतात,हे या प्रकल्पाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

रोटरी क्लब सेंट्रल स्थापनेपासूनच मागील आठ वर्षे शहर परिसर व तालुक्यात रोटरीच्या माध्यमातून वृक्षारोपण मोहीम राबवत आहे आणि लावलेली सर्व झाडे वाचवत आहे.मागील वर्षांपासून हरित माजलगाव ही संकल्पना घेऊन शहरात मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येत आहे त्यातील मुख्य रस्त्यावरील दोन किमीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून या वर्षीच्या पुढील टप्प्यात डॉ. आंबेडकर चौक ते मौ. आझाद चौक तसेच बायपास रोड व केसापुरी कॅम्प पर्यंत वृक्षारोपण करण्यात येणार असून यात



पर्यावरणप्रेमी सर्व नागरिकांनी उस्फुर्त सहभागी व्हावे. – प्रभाकर शेटे,

## पान ६ वरुन...

### वाहतुकीस अडथळा निर्माण

दुकानाचे सामान, फळगाड्या लावून वाहतुकीस अडथळा निर्माण केला होता. त्यांच्या विरोधात अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भविष्यात देखील सार्वजनिक रस्त्यांवर अडथळा निर्माण करणाऱ्या दुकानदार, हातगाडीवाले आणि वाहनचालकांवर कठोर कारवाई केली जाईल.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहा. पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शहरात वाढत्या वाहतुकीचा भार आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या या कारवाईचे सर्वत्र स्वागत होत आहे.वाहतूक व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांचा घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे.

### डॉ.योगेश क्षीरसागरांच्या

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, अतिक्रमण हटवणे, प्रमुख रस्त्यांना मंजुरी देणे (स्टेडियमजवळील रस्ता, धानोरा रोड, ब्रह्मकुमारी केंद्र ते उर्वी अपार्टमेंट, तहसील ते निरा हॉस्पिटल मार्ग), प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि दलित वस्ती तसेच इतर नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे यांसारख्या मागण्या निवेदनात नमूद आहेत. शहरातील दैनंदिन जीवनाशी निगडित या सर्व समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शिष्टमंडळाने केली असून, मुख्याधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजपाच्या बालाघाट

महादेव नागरगोजे, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केलेले हरीश खाडे, सरचिटणीस आप्पासाहेब झोडगे उपाध्यक्ष वैशाली प्रदीप चौरे, उपाध्यक्ष अंकुश गोरे, उपाध्यक्ष वामन मुंडे, उपाध्यक्ष बाळासाहेब हावळे , संजय काळे उपाध्यक्ष, चिटणीस बाळासाहेब डोळस, चिटणीस अविनाश राव भोसले,चिटणीस विजयजी दराडे,चिटणीस रंजना कानडे,चिटणीस अजय सावंत, कोषाध्यक्ष नवनाथ जी चव्हाण यांच्यासह तालुका कार्यकारणीतील सदस्य यांच्यासह भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोहिणी ग्रामपंचायच्या

आदेशाने व आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कोहिनी पाटण ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांच्या उपस्थितीत पार पडला. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणाऱ्या या मोहिमेसाठी संपूर्ण जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन, शासकीय व खासगी संस्था, सेवाभावी संघटना, शाळा व महाविद्यालये यांची सक्रिय भागीदारी असून, सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. हरितक्रांतीचा संकल्प घेऊन सुरु झालेल्या या अभियानामुळे कोहिनी पाटण ग्रामपंचायत परिसराचे पर्यावरणीय संतुलन सुधारण्यास मदत होणार आहे. असे मत यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांनी व्यक्त केले.

### शहरातील कोणताही घटक

संदर्भात अत्यंत जाणीवपूर्वक चांगली पावले उचलून या भागातील विकास करण्यात येईल व यातून कोणताही घटक वंचित राहणार नाही असे आश्वासन दिले ना. अजितदादा पवार यांच्या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये बीड करांना नव्या विकासाची पाऊलवाट दिसत आहे तसेच शहरातील भुयारी गटार योजना, व अमृत पाणी पुरवठा योजनेतील भ्रष्टाचार व काम पुर्ण करण्यासाठी व स्वच्छता,विद्युत लाइट, विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून शहरातील नागरिक अत्यंत सुंदर, सुरक्षित, व नियोजन बंध पायाभूत सुविधांवर विशेष लक्ष देण्यात येईल व या पुर्वी च्या लोकप्रतिनिधींकडून विकास न झाल्यामुळे व खुप बॅकलॉग भरावा लागेल व तो नियोजन बंध बॅकलॉग सर्व कामे करून टप्प्या टप्प्याने भरुन काढण्यात येईल असे अजितदादा पवार साहेब यांनी आश्वासन दिले या शिष्टमंडळात भागवत तावरे, शेख निजाम, शेख अमर, शेख खय्युम इनामदार, शेख नसिर, मोमीन जुबेर, शेख सत्तार इनामदार, सय्यद आजम, शेख कदीर, बळीराम शिराळे, जयंत वाघ, अनेक राष्ट्रवादीपक्षा चे कार्यकर्त्ये उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस सोशल मीडिया बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या शिफारशीवरून सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांनी केली.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात पक्षाचे सरचिटणीस आ.शिवाजीराव गर्जे, लतीफ तांबोळी, बोरगे यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर बीडमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मेघराज जगदाळे यांना गुरुवारी (दि.७) नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे उपस्थित होते. दरम्यान, मेघराज जगदाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मीडिया माध्यमातून



पक्षाची वैचारिक भूमिका आणि अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल मेघराज जगदाळे यांचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.

# शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. परमेश्वर सातपुते यांच्यावर बीड जिल्ह्यासह बीड शहर व पिंपळनेर सर्कल मधील विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जणू शुभेच्छाचा वर्षाव सुरू होता. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्हाट्सअपद्वारे तर शिवसेनेचे सचिव तथा शिवसेना नेते विनायक राऊत यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या तर खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्लीला आसतानाही फोनवरून शुभेच्छा दिल्या, याचप्रमाणे आमदार माजी आमदार माजी मंत्री, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तसेच अनेक विविध पक्षाचे आजी माजी जिल्हाप्रमुख, जिल्हाअध्यक्ष,



सामाजिक संघटनाचे पदाधिकारी विवध पक्षाचे तालुकाध्यक्ष, उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख सर्व पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक बंधू भगिनी, त्याचप्रमाणे पत्रकार, डॉक्टर, वकील,शिक्षक, सर्व स्नेही मित्र सहकारी युवा, जेष्ठ शेतकरी कष्टकरी यांच्या सह सर्वजण यांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रेमरूपी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

समाजासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा वाढदिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता न ठेवता सामाजिक कार्यांनी साजरा करावा, ही प्रेरणा देणारा एक वेगळाच आदर्श शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त घालून दिला. त्यांचा वाढदिवस यंदा पिंपळनेर सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, सामाजिक उपक्रम आणि जनसंपर्काच्या कार्यक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात आणि सेवाभावी दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला.

# माजलगावात मुख्यरस्त्यावर साचते गुडघाभर पाणी!

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील मुख्य रस्त्यावर पडणाऱ्या पावसामुळे नरवडे कॉम्प्लेक्ससमोर गेल्या अनेक दिवसांपासून साचलेल्या गुडघाभर पाण्यामुळे व्यापाऱ्यांचे हाल सुरू असून आहेत.यामुळे नागरिक,वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.दरम्यान मोहन जगताप यांनी दि ०७ ऑगस्ट गुरुवार रोजी दुपारी रस्त्यावर उतरत या प्रश्नासंदर्भात नगरपरिषद कर्मचाऱ्यांची कान उघडनी केली.

दरम्यान यावेळी नागरिकांनी लोकप्रतिनिधीच्या निष्काळजीपणा विषयी संताप व्यक्त केला.

सतत पडणाऱ्या पावसामुळे शहरातील बीड रोड नरवडे कॉम्प्लेक्स समोरील परिसर दोन्ही बाजुने पाण्याने तुडुंब भरल्या जात

आहे.रस्त्याच्या दोन्ही बाजूला गुडघाभर पाणी जमा होते.नगर परिषद गेल्या पाच ते सहा वर्षां पासून प्रशासकाच्या ताब्यात आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधीचे नियंत्रण नाही.नाल्यांची सफाई नसल्याने पावसाचे पाणी



**मोहन जगताप यांनी रस्त्यावर उतरत नगरपरिषद कर्मचाऱ्यांची केली कानऊघडणी; लोकप्रतिनिधींच्या निष्काळजी कारभारावर व्यापाऱ्यांचा संताप**

नालीत अनं नाल्याचे पाणी रस्त्यावर साचते.आणि शहरातील मुख्य भागात असह्य परिस्थिती निर्माण होते.नगरपरिषद लोकप्रतिनिधींनी आता तरी जागं व्हावं,साचलेल्या पाण्याचा तत्काळ निचरा करून व्यापार आणि नागरिकांचे हाल थांबावेत,यासाठी छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप रस्त्यावर उतरले.यावेळी त्यांनी रस्त्याची नाल्याची पाहणी केली.व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले. तात्काळ हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली.यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक शरद यादव,शंकर शेंडगे, आबा नाईकनवरे, सर्जेराव शिंदे,शेख रशीद,बालाप्रसाद नाटकर,गोविंद ईतापे,कल्याण जाधव सह नागरिक उपस्थित होते.

# खरमाटे महाराज यांचे १३ ऑगस्टला भगवान बाबा जन्मोत्सवनिमित्त किर्तन

बीड । प्रतिनिधी

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष वे१८ प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप आयोजित बहुजनांचे दैवत ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत भगवानबाबा यांचा जन्मोत्सव( जयंती) दि. १३ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांने साजरा होत आहे. सकाळी मुर्ती अभिषेक,आरती व जन्मोत्सव निमित्ताने लावलेला ''भावार्थ रामायण''अरण्य कांड''या ग्रंथाची विधीपूर्वक सांगता होईल.तदनंतर सकाळी ११ते १ यावेळत ह भ प मोहन महाराज खरमाटे यांचे राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जिवन चरित्र पर किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.किर्तना नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ बीड शहरातील व परिसरातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भावीकांनी केले आहे.



## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६७६/२०२५**
**मार्फत ॲड.ए.आर.बावसचकर गेवराई**
**मच्छिंद्र व इतर वि निरंक**

ज्याअर्थी मयत कुशीवर्ता भ्र. लक्ष्मण अनभुले रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड हे दिनांक ०५/०४/२०२४ रोजी साठेवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ मच्छिंद्र पि. लक्ष्मण अनभुले, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. २. भिमराव पि. लक्ष्मण अनभुले वय २७ वर्षे, धंदा– शेती रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. ३ लक्ष्मण पि. लिंबाजी अनभुले, वय ६० वर्षे, धंदा शेती रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत कुशीवर्ता भ्र. लक्ष्मण अनभुले रा. साठेवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८ /०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/०९/२०२५

**आदेशावरुन,**
**स्वाक्षरीत**

**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, गेवराई

**सहाय्यक अधीक्षक दिवाण न्यायालय**
**क.स्तर, गेवराई**

# अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाचा कोकणकरांना फटका; रत्नागिरी हापूस निर्यात महागणार

अमेरिकेने भारतासह काही देशांच्या कृषी उत्पादनांवर २५ टक्के आयात शुल्क लादले आहे. या निर्णयाचा थेट फटका कोकणातील आंबा पल्प उद्योगालाही बसणार आहे. विशेषतः रत्नागिरी हापूसच्या पल्पची मोठ्या प्रमाणावर निर्यात अमेरिका आणि युरोपमध्ये होते. आता या पल्पच्या किमती २५ टक्क्यांनी वाढणार असल्याने निर्यातदारांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.भारतातून दरवर्षी सुमारे १५ हजार मेट्रिक टन आंबा पल्प निर्यात केला जातो. यापैकी सुमारे ३०० कोटी रुपयांचा पल्प अमेरिकेला पाठवला जातो. कोकणातून एकट्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतून सुमारे ५० कोटी रुपयांचा हापूस पल्प अमेरिका, युरोप आणि गल्फ देशांत पाठवला जातो. मात्र, अमेरिकेने लागू केलेल्या नव्या टॅरिफमुळे या पल्पवर आता अतिरिक्त १२.५ कोटी रुपयांचा कर बसणार आहे. परिणामी, अमेरिकन बाजारात हा पल्प २५ टक्के महाग होईल आणि ग्राहकांमध्ये त्याची मागणी कमी होण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

कोकणात हापूस आंब्याची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. या आंब्यापासून तयार होणारा पल्प केवळ देशात नव्हे, तर परदेशातही अत्यंत लोकप्रिय आहे. विशेषतः अमेरिकेत कोकणातील पल्पची मागणी अधिक आहे. त्यामुळे हा टॅरिफ निर्णय कोकणातील शेतकरी, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांसाठी आर्थिक नुकसान करणारा ठरणार आहे. ''रासायनिक पदार्थ न वापरता नैसर्गिक पद्धतीने तयार होणारा हापूस पल्प ही आमची खासियत आहे. पण आता अमेरिकेच्या नव्या धोरणामुळे आम्ही स्पर्धेत टिकू शकतो का, हा मोठा प्रश्न आहे,'' असं मत रत्नागिरीमधील एका पल्प निर्यातदाराने व्यक्त केलं.निर्यातदार संघटनांनी केंद्र सरकारकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. अमेरिकेकडून लावण्यात आलेल्या टॅरिफचा फेरविचार व्हावा, अथवा भारत सरकारने काही सवलती जाहीर कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अन्यथा, आगामी काळात पल्प निर्यातीत घट होण्याचा धोका आहे, असं व्यापाऱ्यांचं म्हणणं आहे.



## सोन्याप्रमाणे चमकणारी 'सोनपरी शेळी'; खास वैशिष्ट्यांमुळे जास्त मागणी

भारतामध्ये शेळ्यांच्या अनेक जातींमध्ये सोनपरी शेळीची जात खूप लोकप्रिय आहे. या जातीच्या शेळीपालनातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा मिळवता येतो. जाणून घेऊ या शेळीची वैशिष्ट्ये.

सोनपरी शेळीची वैशिष्ट्ये : सोनपरी शेळी ही बेरारी शेळी आणि ब्लॅक बंगाल या दोन शेळीच्या संकराने तयार झाली आहे. या शेळीची खास गोष्ट म्हणजे या शेळीची कातडी चमकदार असल्यामुळे ही सोन्यासारखी दिसते त्यामुळे तिला सोनपरी असे म्हणतात. ही शेळी प्रामुख्याने मांसासाठी पाळली जाते. त्याच्या मांसाला बाजारात चांगली मागणी आहे.शरीर रचना : सोनपरी जातीच्या शेळीचा रंग तपकिरी किंवा काळा असतो. त्याच्या मागच्या बाजूला डोक्यापासून शेपटीपर्यंत एक काळी रेष असते ज्यामुळे ती अधिक उठून दिसते. त्याच्या मानेवर एक काळे वर्तुळ असते. शेपटी मागे वक्र झालेली असते. कान पानाच्या आकाराचे असून खालच्या दिशेने वाकलेले असतात. शिंग चपटे असून बाहेरच्या बाजूस पसरलेले असतात. या शेळीचे वजन साधारणपणे ३५ ते ४० किलो असते. ही शेळी दरवर्षी ३ ते ४ पिलांना जन्म देते. त्यामुळे लहान पशुपालक अल्पावधीत या शेळीचे पालन करून लाखो रुपये सहज कमवू शकतात. सोनपरी शेळीची किंमत : सोनपरी शेळीच्या मांसाला बाजारात चांगली मागणी असल्याने त्याची किंमतही बाजारात चांगली आहे. इतर शेळ्यांच्या तुलनेत सोनपरी बोकडाची बाजारातील किंमत २२ ते २५ हजार रूपयांपर्यंत आहे. अशा परिस्थितीत या शेळीचे पालनपोषण करून चांगले उत्पन्न मिळू शकते. सोनपरी शेळीची देखभाल : सोनपरी शेळीच्या देखभालीसाठी विशेष व्यवस्था करावी लागत नाही. घराच्या एका कोपर्यातही बांधून ठेवू शकता. ही शेळीही झाडाची पाने खाऊन जगते. याशिवाय फळे, भाज्या, हिरवे गवत इत्यादी खाते. सोनपरी शेळी उष्ण व कोरड्या हवामानात सहज राहू शकते.




## गोगलगायींच्या समस्येवर एकात्मिक नियंत्रण

महाराष्ट्रातील अनेक भागात गोगलगायीची समस्या जास्त प्रमाणात निर्माण होत आहे. मुख्यतः ओलसर वातावरणात आढळणारी गोगलगाय शेतीचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान करते. या लेखात आपण गोगलगायींमुळे होणारे नुकसान आणि त्यांच्या नियंत्रणासाठी सांस्कृतिक, भौतिक, जैविक, आणि रासायनिक उपायांची माहिती घेणार आहोत.

गोगलगायींमुळे होणारे नुकसान : महाराष्ट्रातील शेतकरी गोगलगायींच्या समस्येमुळे खूप त्रस्त आहेत. गोगलगाय ओलसर आणि आर्द्र वातावरणात वाढतात, ज्यामुळे पावसाळ्याच्या काळात त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. गोगलगाय खालील प्रमाणे नुकसान करते. गोगलगाय पिकांच्या पानांना खाऊन टाकते, ज्यामुळे पिकांचे उत्पादन कमी होते. हे कीटक रात्रभर पिकांवर आक्रमण करतात आणि मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. हे कीटक विशेषतः पिकांच्या कोवळ्या भागांना जास्त हानी पोहचवतात. त्यांच्यामुळे निर्माण झालेले पानांवरील छिद्रं, खाऊन टाकलेल्या देठांमुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होतो आणि आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. गोगलगायींनी पिकांना इतकी मोठी हानी पोहचवली आहे की, उत्पन्नात ३०-४०% घट झाली आहे. हे कीटक केवळ पिकांच्या कोवळ्या भागांना नष्ट करत नाहीत, तर मुळांनाही हानी पोहचवतात, ज्यामुळे पिकांची वाढ थांबते.

गोगलगायींवर नियंत्रण करण्याचे एकात्मिक उपाय : गोगलगायींवर नियंत्रण मिळवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करता येतो. यामध्ये सांस्कृतिक, भौतिक, जैविक, आणि रासायनिक उपायांचा समावेश होतो. प्रत्येक उपायाची आपली एक विशेषता आणि कार्यक्षमता असते, ज्याचा वापर



शेताच्या परिस्थिती आणि गोगलगायांच्या प्रादुर्भावानुसार करता येतो.

पाण्याचे व्यवस्थापन : गोगलगायी ओलसर वातावरणात वाढतात, म्हणून पाण्याचे योग्य व्यवस्थापन केल्याने जमिनीतील ओलसरता कमी करता येतो, ज्यामुळे गोगलगायींची संख्या कमी होते.

भौतिक उपाय : पिकांच्या आजूबाजूला तांब्याच्या पट्ट्या, खड्डू, किंवा अंड्याच्या कवचाचा वापर केल्याने गोगलगायींना रोखता येते. तांब्याच्या पट्ट्यांमुळे गोगलगायींचा शरीरातील विद्युत प्रवाह प्रभावित होतो, ज्यामुळे ते पुढे जाऊ शकत नाहीत. गोगलगायींना हाताने गोळा करून शेतातून काढून टाकणे, विशेषतः लहान शेतात किंवा घराच्या बागेत हे उपयुक्त ठरते.

जैविक उपाय : बदक, कोंबड्या, बेडूक, आणि काही बीटल्स हे गोगलगायींचे नैसर्गिक शत्रू आहेत. यांना शेतात ठेवून गोगलगायींची संख्या नियंत्रित करता येते. नेमाटोड्सचा वापर करून गोगलगायींना मारता येते. हे परजीवी नेमाटोड्स गोगलगायींच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्यांना मारतात. उदा. नेमास्लग नेमाटोड्स

रासायनिक उपाय : आयर्न फॉस्फेट किंवा मेटलडिहाइड-आधारित मॉलस्किसाइड्सचा वापर केला जातो. आयर्न फॉस्फेट हे पर्यावरणास सुरक्षित असते आणि ते इतर प्रजातींना नुकसान पोहचवत नाही. विषारी चारा ठेवून गोगलगायींना आकर्षित केले जाते. हे चारा ठिकाणांवर योग्य ठिकाणी ठेवणे आवश्यक असते, ज्यामुळे इतर प्राण्यांना हानी पोहचणार नाही.

बिअर आणि यीस्ट सापळ्यांचा वापर : गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी बिअरचा सापळा अत्यंत प्रभावी आहे. बिअरमध्ये असलेल्या फर्मेंटेशन बाय-प्रॉडक्ट्समुळे गोगलगायीं त्याकडे आकर्षित होतात. बिअरचा सापळा तयार करण्यासाठी शेतातले कंटेनर जमिनीवर ठेवून त्यात बिअर भरली जाते. गोगलगायी बिअरच्या वासाने आकर्षित होऊन त्यात अडकतात आणि मरतात. याशिवाय, यीस्ट आणि साखर पाण्यात मिसळून तयार केलेला सापळा देखील प्रभावी ठरतो. यीस्ट सापळा तयार करण्यासाठी पाण्यात साखर मिसळून त्यात यीस्ट घातली जाते. हे मिश्रण बिअरप्रमाणेच गोगलगायींना आकर्षित करते आणि त्यांना नष्ट करण्यास मदत करते. हे सापळे शेताच्या विविध ठिकाणी ठेवून गोगलगायींच्या आक्रमणावर नियंत्रण मिळवता येते.

## ऊस पिकातील आंतरपिक व्यवस्थापन

ऊस लागवड केल्यानंतर पूर्ण उगवणीसाठी सहा ते आठ आठवडे कालावधी लागतो. सुरूवातीच्या काळात वाढ हळू होते. उसाच्या दोन सऱ्यांमध्ये मोकळ्या जागेत आंतरपीक घेतल्याने तणांचे प्रमाण कमी होते. सुरू ऊसामध्ये भुईमूग, मेथी, कोथिंबीर, कलिंगड, काकडी व कांदा ही आंतर पिके फायद्याची ठरतात. द्विदल वर्गातील आंतरपीक घेतल्यास जमिनीचा पोत सुधारतो. उसामध्ये आंतरपीक घेतल्याने नक्कीच फायदा होतो. प्रामुख्याने उसाचे निव्वळ उत्पन्नात वाढ होतो. उसाचे बियाणे, खते व आंतरमशागतीसाठी झालेला खर्च आंतरपिकांच्या उत्पन्नातून निघतो.

ऊस पिकात आंतरपीक घेतल्या मुळे होणारे फायदे : ऊस पिकात मोकळी जागा असते तिथे आंतरपिकं घेता येते. आंतरपिके घेतल्याने भरपूर फायदा होतो. प्रामुख्याने आंतरपीक यामुळे एकूण निव्वळ उत्पन्नात वाढ होते. उसासाठी बियाणे, खते व आंतरमशागतीसाठी केलेला खर्च आंतरपिकाच्या उत्पन्नातून निघून जातो. तणांच्या वाढीवर परिणाम होऊन तणांचे प्रमाण कमी होते. द्विदल वर्गातील आंतरपीक घेतल्यास जमिनीचा पोत सुधारतो. ऊस पिकात भुईमूग, कोबी, फुलकोबी, मेथी, कोथिंबिर, कलिंगड, काकडी व कांदा ही आंतर पिके घेतली जातात. वरील प्रमाणे ऊस पिकात आंतर मशागत आणि अंतर पिके घेतली जातात.

१. सुरू ऊस-कांदा : सुरू ऊस सहा ते आठ आठवड्यांचा झाल्यानंतर म्हणजेच त्याचे कोंब जमिनीवर उगवून आल्यानंतर कांदा या पिकाच्या रोपांची वरंब्याच्या दोन्ही बाजूला लागण करावी. या आंतरपिक पद्धतीमध्ये कांद्याला उसाबरोबरच पाणी आणि खते मिळतात. त्यामुळे त्याला वेगळे पाणी आणि खत देण्याची गरज भासत नाही. कांद्याची मुळे ही जमिनीत खूप खोलवर जात नाही. ती फक्त पाच ते दहा सें.मी. एवढ्या खोलवर जातात. त्यामुळे तेवढ्यात जमिनीतून ती



अन्नद्रव्ये शोषून घेतात. त्याचा ऊस या मुख्य पिकावर कोणताही परिणाम होत नाही. विशेषत: सुरूवातीच्या काळात ऊसाची वाढ खूप मंद गतीने होत तर त्याच काळात कांद्याची वाढ जलद गतीने होते त्यामुळे कांदा काढणीसाठी साडेतीन ते चार महिन्यात तयार होतो. आंतरपिक म्हणून लागवड केलेल्या कांद्याची उत्पादकता सरासरी १५० ते २०० क्विंटल प्रति हेक्टरी एवढी मिळते कारण या कांद्याची लागवड आपण रोपाची पुनर्लागन करून केलेली असते असे हे आंतरपिक ऊस या मुख्य पिकाबरोबर पाणी, प्रकाश, अन्नद्रव्ये यांबाबतीत कुठेही स्पर्धा करत नाही. व शेतकर्याला दुहेरी उत्पन्न मिळवून देते.


२. सुरू ऊस + भुईमूग

ही आंतरपिक पद्धती जमिनीशी सुपिकता वाढवण्यासाठी तसेच अतिरिक्त उत्पन्न व नफा मिळवण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. सुरू ऊसाचे कोंब जमिनीवर आल्यावर भुईमूग या पिकाची लागवड टोकण पद्धतीने वरंब्याच्या दोन्ही बाजूला करावी. कांद्याप्रमाणेच भुईमूग या पिकाला वेगळी अन्नद्रव्ये तसेच पाणी देण्याची आवश्यकता भासत नाही. सुरूवातीलाच खताबरोबर जमिनीमध्ये अन्नद्रव्ये मिसळलेली असतात तसेच ऊस पिकाच्या गरजेनुसार पिकाला पाणी दिले तरी चालते. भुईमूग हे पीक जमिनीत नत्र स्थिरिकरण करणारे पीक आहे. या पिकाच्या मुळांच्या गाठीत रायझोबियम नावाचे जिवाणू हवेतील नत्र जमिनीत स्थिरीकरण सहजीवी पद्धतीने करतात. भुईमूग या पिकाने जमिनीत स्थिर केलेले नत्र नंतर सुरू ऊस या पिकाला उपलब्ध होते. याचा मोठा फायदा ऊसाला होतो. ऊसाच्या वाढीवर भुईमूग हे आंतरपिकावर कोणताही परिणाम करत नाही. या पद्धतीमध्ये भुईमूगाचे हेक्टरी दहा ते पंधरा क्विंटल उत्पादन मिळवता येते.

३. सुरू ऊस + काकडी/कलिंगड : ही आंतरपिक पद्धती उन्हाळ्यामध्ये काकडी/कलिंगड या वेलवर्गीय फळपिकांना असलेली मागणी लक्षात घेवून केली जाते. या आंतरपिक पद्धतीत जेव्हा सुरू ऊसाचे पीक सहा ते आठ आठवड्याचे होते म्हणजेच ऊसाचे कोंब उगवून जमिनीवर येतात त्यावेळी प्रत्येक वरंब्याच्या एका कडेला साधारणपणे दोन फुट अंतरावर एक बी याप्रमाणे टोकण पद्धतीने लावतात. काकडी/कलिंगड हे वेलवर्गीय फळपिक असल्यामुळे हे जमिनीवर समांतर पद्धतीने वाढते. या वेलाची वाढ वरंब्यावर केली जाते तसेच या वेलाची फळे वरंब्यावर तसेच सरीमध्ये जेथे ऊस कोंबामध्ये अंतर आहे अशा ठिकाणी वाढवली जातात. या आंतरपिकाला कोणत्याही प्रकारे वेगळी अन्नद्रव्ये तसेच पाणी देण्याची आवश्यकता नसते तसेच या पिकांमुळे ऊस या पिकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही तसेच त्याच्या वाढीवर कोणताही परिणाम होत नाही. आंतरपिक पद्धतीमुळे शेतकऱ्यास काकडीचे ७५ ते १०० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पन्न मिळते तसेच कलिंगडापासून २०० ते २५० क्विंटल प्रति हेक्टरी उत्पन्न मिळते. ही आंतरपिके तीन ते साडेतीन महिन्यांत येणारी असल्यामुळे ऐन उन्हाळ्यात या आंतरपिकांना बाजारात खूप मागणी असते व तसेच ही आंतरपिके शेतकऱ्यांना अधिक नफा मिळवून देतात.

४. सुरू ऊस + मेथी/कोथिंबीर : ही आंतरपिक पद्धती शक्यतो शहरांच्या जवळपास असणार्या ऊस क्षेत्रामध्ये घेतली जाते. उन्हाळामध्ये मेथी/कोथिंबीर या भाज्यांना बाजारात खूप मागणी असते. त्यामुळे शेतकरी नगदी पैसा मिळवण्यासाठी सुरू ऊसात मेथी/कोथिंबीर या भाज्यांची लागवड करावी. ऊस उगवून आल्यानंतर दोन्ही वरंब्याच्या बाजूने मेथी/ कोथिंबीर यांची लागवड करावी. या आंतरपिक पद्धतीमुळे शेतकर्यांना कमी कालावधीत नगदी पैसा पिकावर कोणताही परिणाम होत नाही.

५. ऊस + आले लागवड : उसाबरोबर अद्रकाची सहाय्यक पीक म्हणून लागवड करता येते. उसासोबत सहाय्यक पीक म्हणून आल्याची लागवड करण्यासाठी अर्धा फूट उंचीचे बेड तयार करा, ज्याची रुंदी सुमारे १ मीटर आणि लांबी आपल्या सोयीनुसार ठेवावी. शिफारशीत उपलब्ध बियाणे वापरावे. लावणी करताना २५ ग्रॅम निंबोळी पेंडीची पावडर लागवडीच्या खड्ड्यात जमिनीत मिसळा. लागवड २५ सें.मी रेषा ते ओळ अंतर आणि २० ते २५ सें.मी. कंद ते कंद अंतरावर करा. पेरणीसाठी २० ते ३० ग्रॅम कंद वापरावेत. कंद लावण्यापूर्वी त्यावर चांगले कुजलेले खत आणि ट्रायकोडर्मा बुरशीचा मिश्रणाने उपचार करा.




### जागतिक दिवस: भारत छोडो दिवस, भारतीय ग्रंथालय दिन आंतरराष्ट्रीय भूमिपूत्र दिन

### महत्वाच्या घटना

- ११७३ : पिसाच्या मनोर्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.
- १८९२ : थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पटेंट मिळाले.
- १९२५ : चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकार्यांनी काकोरी रेल्वेस्थानकावर सरकारी खजिना लुटला.
- १९४२ : 'चले जाव' चा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
- १९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकी शहरावर 'फॅटबॉय' हा अणूबॉम्ब टाकला. यात ३९,००० लोक तत्क्षणी म्रुत्यूमुखी पडले तर हजारो लोकांना पुढील अनेक वर्षे किरणोत्सर्गाचे परिणाम भोगावे लागले. प्रथम हिरोशिमा व नंतर नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.
- १९६५ : मलेशियातुन बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला. आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.
- १९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
- १९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
- १९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
- १९७५ : पंतप्रधानांच्या विरुध्द कोर्टात जाण्यास मनाई करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.
- १९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
- १९९६ : पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार तसचं, भारतरत्न पुरस्कार सन्मानित जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी नियुक्ती करण्यात आली.
- २००० : भाभा अणूसंशोधन केन्द्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील 'इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर
- २००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाचे डिस्कव्हरी हे मानवरहित अंतराळ यान चौदा दिवसांच्या साहसी आणि धोकादायक प्रवासानंतर कॅलिफोर्नियास्थित एअरबेसवर सुरक्षितपणे उतरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १६३१ : इंग्लंड देशांतील पहिले कवी पुरस्कार विजेते इंग्रज कवी, साहित्यिक समीक्षक, अनुवादक आणि नाटककार जॉन ड्राइडन यांचा जन्मदिन.
- १७५४ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (मृत्यू: १४ जून १८२५)
- १७७६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ जुलै १८५६)
- १८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय ( –, २) यांचा जन्मदिन.
- १८९० : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले 'संगीत सौभद्र' मधील धैर्यधराच्या भूमिकेत गाजलेले गायक अभिनेते. 'हाच मुलाचा बाप', 'सन्याशाच्या मुलगा' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ललितकलादर्श संगीत नाटक मंडळींतर्फे 'सौभद्र', 'शारदा', 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' इ. अनेक नाटके रंगभूमीवर आली. (मृत्यू: ४ आक्टोबर १९२१)
- १८९१ : सयुक्त प्रांताचे माजी राज्यपाल फ्रान्सिस वर्नर वाईली यांचा जन्मदिन.
- १८९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी कादंबरीकार, संपादक आणि गद्य लेखक शिवपूजन सहाय यांचा जन्मदिन.
- १९०९ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ञ व इंग्रजी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक (मृत्यू: २८ एप्रिल १९९२)
- १९२० : कृ. ब. निकुम्ब 'घाल घाल पिंगा वार्या, माझ्या परसात' या कवितेमुळे परिचित असलेले भावकवी. त्यांचे अनेक कवितासंग्रह व 'सायसाखर' हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. (मृत्यू:)
- १९३३ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय हिंदी लेखक, पत्रकार आणि पटकथा लेखक व कादंबरीकार मनोहर श्याम जोशी यांचा जन्मदिन.
- १९३७ : मॉरिशस येथील पसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार अभिमन्यू अनंत यांचा जन्मदिन.
- १९७५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते महेश बाबू यांचा जन्म.
- १९९१ : हंसिका मोटवानी अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १९०१ : विष्णूदास अमृत भावे मराठी रंगभुमीचे जनक, त्यांची पन्नासहून अधिक नाट्याख्याने 'नाट्यकवितासंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. (जन्म: ? ? १८१९)
- १९४८ : हुगो बॉस कानी चे संस्थापक हुगो बॉस यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८८५)
- १९६२ : नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध जर्मन स्विस कवी, कादंबरीकार आणि चित्रकार हर्मन कार्ल हेसे यांचे निधन.
- १९७० : ब्रिटीश कालीन भारतात तीस वर्ष तुरुंगवास भोगणारे प्रख्यात भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते व राजकारणी त्रिलोकनाथ चक्रवर्ती यांचे निधन.
- १९७६ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (जन्म: १४ फेब्रुवारी १९१४)
- १९९६ : जेट इंजिन चे शोधक फ्रँक व्हाटलेट यांचे निधन. (जन्म: १ जुन १९०७)
- २००२ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (जन्म: १ जानेवारी १९१८)
- २०१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचे निधन. (जन्म: ८ जून १९१५)

# सर्व अतिक्रमण धारकांना हक्काचा पिटीआर मिळवून देऊ -आ विजयसिंह पंडित

## गेवराईतील अतिक्रमणधारकांना पीटीआरचे वाटप

गेवराई। प्रतिनिधी

गेवराई शहरातील अतिक्रमणधारकाचा पी टी आर चा प्रश्न गंभीर होता. अतिक्रमण धारकांना न्याय मिळाला पाहिजे ही सर्वांची भावना होती. शिवछत्र परिवाराने शासन दरबारी पाठपुरावा करून हा प्रश्न सोडवला, हे खरे असले तरी आपण यात श्रेय घेणार नाही. आपल्या सर्वांच्या संघर्षाचे हे फलित आहे. यापुढील काळात उर्वरित अतिक्रमण धारकांनाही हक्काचा अधिकृत पिटीआर उपलब्ध करून देऊ असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले तर विरोधक सध्या आपण करीत असलेल्या कामाचा अपप्रचार करून राजकारण करत आहेत, पंधरा - वीस वर्षे सत्ता असताना ज्यांना शहरातील प्रश्न सोडविता आले नाहीत त्यांना आता बोलण्याचा अधिकार नाही असा टोलाही त्यांनी विरोधकांना नाव न घेता मारला.

गेवराई नगरपालिकेच्या वतीने संजयनगर येथील अतिक्रमण धारकांना पिटीआर चे वाटप, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेशाचे वाटप आणि नगर परिषदेच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सेवेचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवशारदा मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, मुख्याधिकारी विक्रम




मांडुरके, सभापती मुजीब पठाण, माजी नगरसेवक महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, शेख खाजा भाई, दीपक आतकरे, एस. अन्सारी, राधेशाम येवले, शांतीलाल पिसाळ, रिपाइंचे किशोर कांडेकर, कडुदास कांबळे, भास्कर काकडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विरोधकांनी नगरपरिषदेचा स्वार्थासाठी वापर केला त्यांच्या काळात अतिक्रमण धारकाचा प्रश्न प्रलंबित ठेवला, अनुकंपाधारकांना नियुक्ती पत्र देण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. प्रत्येक वेळी राजकारण करण्याचा प्रयत्न केला. अतिक्रमीत जागेवर गाळे काढून भाडे खाण्याचे पाप केले आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने मला विधानसभेत पाठवले. निवडणूक संपली आणि शिवछत्र परिवार जनतेने दिलेल्या आशिर्वादाची उतराई होण्यासाठी कामाला लागला. नगरपालिकेच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. नागरिकांचे प्रश्न सोडविले. अनुकंपाधारकांना नियुक्ती, संजय नगर सह सर्व अतिक्रमणधारकांना हक्काचा पीटीआर वाटप यांसह नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियोजन केले. विरोधक मात्र त्याचेही श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की शिवछत्र परिवाराने सर्वांना न्याय देण्याचे काम करत आहे. कुणाबरोबरही शिवछत्र परिवाराने दुजा भाव केला नाही आणि करणारही नाही. आदरणीय अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नागरिकांचे प्रश्न समजावून सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधक मात्र आमची कॉपी करत आहेत, येणाऱ्या नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये नगरपालिकेला लागलेले हे हुक काढण्याची वेळ आली आहे. शिवछत्र परिवाराची काम करण्याची पद्धत आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण काम करत आहोत. जुने नवे कार्यकर्ते यांनी समन्वय राखून एक दिलाने काम करावे. लोक स्वीकारला तयार आहेत, शिवछत्र परिवाराची ताकद तुमच्या पाठीशी आहे, सरकार आपले आहे कसलीही अडचण येणार नाही सगळ्यांना न्याय देण्याच्या बाबतीमध्ये शिवछत्र परिवार कधीही मागे राहणार नाही असे सांगून परिषदेमध्ये मदत कक्ष सुरू करण्यात आला असून त्याचा नागरिकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी प्रकाश नरनाळे, सुमनबाई धनवटे, कचराबाई हातागळे, रमेश नन्नवरे, सलमान सय्यद, राजेंद्र सोळुंके, बप्पा आबू उपळकर , खय्युम गुलाब रसूल कुरेशी, शेख अफसर हुसेनी, जनाबाई कांबळे सायरा कालू पठाण यांना प्रातिनिधिक स्वरूपात पिटीआरचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी प्रास्ताविक केले. कडुदास कांबळे, एस. आर. अन्सारी, महेश दाभाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला गेवराई शहरातील नागरिकासह संजयनगर आणि परिसरातील अतिक्रमणधारक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### कृषि दुतांनी राक्षसभुवन येथील गावकऱ्यांच्या गरजा जाणून घेतल्या

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत अमेय गावंडे, स्वप्निल वाघमोडे, विशाल गरुड, सौरव शेंडे, गणेश जंजिरे, धीरज तायनाक, गौरव खराडे, महेश गडदे विश्वतेज दुपडे, हरी जंगमवार यांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषी संलग्नता उपक्रम २०२५-२६ अंतर्गत राक्षसभुवन (देवीचे) गावकऱ्यांच्या गरजा या प्रात्यक्षिकाद्वारे औरंगपूर गावातील शेतकऱ्यांकडून त्यांच्या गरजा जाणून घेतल्या. बदलत्या हवामानामुळे पिकांवर कीड व रोगांच्या समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे कीड व रोगापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणत्या उपाययोजना कराव्यात याबद्दल सविस्तर माहिती दिली. या प्रात्यक्षिका वेळी राक्षसभुवन (देवीचे) गावातील शेतकरी वर्ग व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. या प्रात्यक्षिकाकरिता कृषीदूतांना महाविद्यालयातील कृषि विस्तार शिक्षण विभागाचे विषय तज्ञ प्रा. वैभव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषी संलग्नता उपक्रमाकरिता विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण अपेट, प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्ग त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

### आज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सांगता

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची आज शनिवार दि ९ ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने महाप्रसादाने सांगता होणार आहे. आज पहाटे ४ वाजता किसन बाबा महाराज यांच्या समाधीची पूजन गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत करण्यात येणार आहे. सकाळी १२ ते ०२ वेळेत विदर्भरत्न रामायणाचार्य संजयजी महाराज पाचपोर बुलढाणा यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यांना कीर्तन साथ नानाभाऊ म .लांडे, लक्ष्मीकांत म .कदम यांची व मृदुंगसाथ धनंजय म.बोंगणे , अनिकेत म .लांडे यांची राहील.काल्याचे कीर्तन झाल्यावर महाप्रसादाच्या महापगती बसवण्या येतील महाप्रसादाच्या महापांगतीने सात दिवस सुरू असणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. गुरुवर्य किसानबाबा यांच्या पुण्यस्मरणार्थ गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपूर्ण सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन कीर्तन, अभंगवाणी, भारुड, हरी जागर यांनी भक्तिमय वातावरणात भाविक भक्तांनी भक्तीचा आनंद घेतला. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जयंती वर्ष असून त्यांच्या समाजोध्दारक, न्यायप्रिय व लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण, शक्तीचा आदर नेतृत्वगुण मुल्याधिष्ठित विचारांची रजवणूक करण्यासाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण बीड विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे.या अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील प्रसंगावर विविध स्पर्धांचे आयोजन करुन इयत्ता ०८ वी ते १२ वीतील नव युवक व युवतींना या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार आहे. यामध्ये रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार), निबंध स्पर्धा (विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य) या स्पधांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सर्व स्पर्धा दि. १३ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत होणार आहेत. यामध्ये वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे ठिकाण तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड बीड, तर रांगोळी स्पर्धेचे ठिकाण तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे घेण्यात येणार आहेत. रांगोळी, वक्तृत्व,निबंध स्पर्धेतील प्रत्येकी प्रथम पारितोषिक रक्कम १०,०००/- व्दितीय पारितोषिक रक्कम ७,०००/- व तृतीय पारितोषिक रक्कम ५,०००/ - व सन्मानपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. १) रांगोळी स्पर्धा: श्री. देशपांडे गोविद दिगांबर मो. ९०१११४४३१४ २) वक्तृत्व स्पर्धा : श्री. शुक्ला प्रसाद उमाकांत मो. ९१३०९५४०९५ ३ ) निवध स्पर्धा श्री शिनगारे विशाल मच्छिद्र मो. ९०२८८५६८०२ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त आयोजित विविध स्पर्धेत जास्तीत-जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे, सहायक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी केले आहे.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वतयारी आढावा बैठक

बीड । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली.या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) शैलेस सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर संबधित अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाची रूपरेषा, आयोजनाची जागा, सुरक्षा व्यवस्था, शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, वाहतूक व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवस्था, वीज आणि पाणीपुरवठा याविषयी जिल्हाधिकारी श्री. जान्सन यांनी संबधित यंत्रणेस सूचना दिल्या. १५ ऑगस्टच्या अनुषंगाने सांस्कृतीक कार्यक्रम जसे विद्यार्थ्याचे डान्स, देशभक्तीपर गीत, लोकगीत तसेच इतर कार्यक्रम आणि १५ ऑगस्टच्या कार्यक्रमासाठी आजी माजी स्वतंत्र सैनिक या सर्वांना कार्यक्रमासाठी अग्रहाचे निमंत्रण देऊन त्यांची एकाच सोयीने बैठक व्यवस्था करावी असेही श्री. जॉन्सन यांनी या बैठकीत सूचित केले. जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित विभागांना परस्पर समन्वय साधून वेळेत तयारी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी जनजागृती कार्यक्रम राबवण्याचेही निर्देश दिले.शासनाच्या सूचनांनुसार १५ ऑगस्टचा शासकीय कार्यक्रम साजरा करण्यात येणार असून, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

## गोंदी पोलीस स्टेशन हद्दीत एकाच रात्री चार घरफोड्या

### पो. नि. मुख्यालयी नसल्याने चोऱ्या वाढल्या

जालना। प्रतिनिधी

गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वारंवार चोरीच्या घटनेमध्ये वाढ झाली असून तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक स्थानक राहत नसल्यामुळे चोरीच्या घटनेमध्ये वाढ झाल्याचे बोलल्या जात आहे. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी गोंदी पोलीस स्टेशनचं स्पेशल अडेड करणे गरजेचे आहे . हसनापूर गावात मध्यरात्री सशस्त्र चोरट्यानी चार घरे फोडून ९ तोळे सोने आणि २६ हजाराची रोकड लपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत थोडक्यात माहीती अशी की, अंबड तालुक्यातील हसनापूर येथील तुकाराम ज्ञानेश्वर बोबडे यांच्या घरात मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास चोरट्यांनी मागील दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरात झोपलेल्या सासू आणि सुनेला कसलीही भणक न लागू देता चोरट्यांनी दोन लोखंडी पेट्या उचलुन जवळच्या ऊसाच्या शेतात नेल्या. या पेट्यामध्ये ८ तोळे सोन्याचे दागिने आणि ३० हजार रूपये रोख रक्कम चोरट्यांनी लांबवली. याच घरातील खालच्या मजल्यावर

असलेली लोखंडी पेटी आणि सुटके सचीही चोरट्यांनी तोडफोड केली. त्यानंतर अप्पा व्यंकोजी खंडागळे यांच्या घरात पती-पत्नी झोपलेले असतांना चोरट्यांनी त्या खोलीचा दरवाजा बाहेरून बंद केला आणि दुसऱ्या खोलीत जावून कपाट उघडले मात्र त्यात काही मिळाले नाही. तेथे असलेली लोखंडी पेटी उचलुन चोरट्यांनी जवळच्या कापसाच्या शेतात नेवून त्यातील दहा हजाराची रोख रक्कम लांबवली. त्यानंतर चिंतामणी जालिंदर खंडागळे यांच्या घराकडे मोर्चा वळवून चोरट्यांनी घर बांधकामाच्या कामातून संसार उपयोगी साहित्य पत्र्याच्या गोठ्यात ठेवले होते चोरट्यांनी एक ग्रॅमचे मनीमंगळसुत्र आणि आईने घरभरणीसाठी लोखंडी पेटीतील १६ हजार रूपये रोख चोरट्यांनी पळवले. त्यानंतर प्रकाश दगडू सिरसाठ यांच्या घरातील लोखंडी पेटीतून १० ग्रॅम सोन्याचे दागिने घेवून चोरटे पळाले. दरम्यान, एकाच रात्रीतून चार ठिकाणी झालेल्या धाडसी घरफोड्यामुळे ग्रामस्थ भयभयीत झाले असून गोंदी पोलीसांचा चोरट्यांवर अजिबात वचक राहीला नसल्यामुळे या चोऱ्या होत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये असून पोलीसांनी ठसे तज्ञांना घटनास्थळी पाचारण केले, गुन्हाही नोंदवला मात्र, अजूनतरी कोणताही मुद्देमाल न सापडल्यामुळे ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांना या चोरी प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी केली असून सुस्तावलेल्या गोंदी पोलीसांना झोपेतून उठवण्याची मागणी देखील केली आहे.

## ८ वर्षांपूर्वी बांधलेल्या स्मशानभूमीत एकही अंत्यविधी नाही

### जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार; बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील प्रकार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील १३९४ गावांपैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच अस्तित्वात नाही तर काही ठिकाणी बांधलेल्या स्मशानभूमीची अत्यंत दुरावस्था असुन बांधकाम ढासळलेल्या स्थितीत तर वादळी वाऱ्यासह पावसात पत्रे उडून गेल्याने निवारा नाही त्यामुळे पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी अडचण निर्माण होते. मृतदेहाची विटंबना होते. काही गावांमध्ये अंत्यविधी रोखल्याने मृतदेह शासकीय कार्यालयासमोर आणुन ठेवल्याच्या घटनांत वाढ होत आहे. दुसरीकडे मात्र जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार पहावयास मिळत असुन बीड तालुक्यातील महाजनवाडी येथे ८ वर्षापुर्वी ६ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीत अद्याप एकही अंत्यसंस्कार विधी झाला नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वापरात नसलेली स्मशानभूमी जिल्हा प्रशासनाने केवळ गुत्तेदार पोसण्यासाठीच बांधली का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विचारला आहे.

बीड तालुक्यातील महाजनवाडी गावची लोकसंख्या २२०० च्या आसपास असुन पुर्वी गावात चिंचेच्या झाडाखाली असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होऊन घरे,गायगोठे बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी स्मशानभूमीची जागा शिल्लक नसल्याने तत्कालीन गावपुढा-यांनी



गावापासून अडीच किलोमीटर दुर असलेल्या गायरान जमिनीत स्मशानभूमीचे बांधकाम केलेले आहे. बहुतांश शेतकरी आपल्या शेतात अंत्यविधी करतात तर भुमिहीन असणारे गावालगत नदीच्या ओढ्यात अंत्यविधी करतात. अडीच किलोमीटर गावाच्या बाहेर अंत्यविधीसाठी कोणीही याठिकाणी येत नाही. स्मशानभूमीत ठेवण्यात आलेली लोखंडी जाळी सुद्धा नंतर काढुन नेण्यात आली. त्यामुळे हि स्मशानभूमी वापराविना पडुन असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले. स्मशानभूमीच्या जागेवर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न आहे.या अतिक्रमणामुळे स्मशानभूमीची जागा ईतर कारणासाठी वापरली जात आहे. त्यामुळे तेथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या मुलभूत हक्कावर गदा येत आहे. स्मशानभूमीच्या जागेवरून समाज आणि स्थानिक प्रशासन मध्ये संघर्ष निर्माण होतो आहे.अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी आणि जागांचा ताब घेऊन त्या सुरक्षित कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## २९ ऑगस्ट मुंबई आंदोलनाच्या निमित्ताने लिंबागणेश येथे चावडीवरील बैठक

लिंबागणेश । प्रतिनिधी

संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागण्यांसाठी मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण, कुणबीमराठा समानतेची घोषणा, ५८ लाख नोंदींची त्वरित अंमलबजावणी, ओबीसी प्रमाणपत्र देण्याची सुलभ प्रक्रिया, आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे, तसेच कायमस्वरूपी आणि कायदेशीर आरक्षणाची हमी या मागण्यांसाठी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या भव्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन



करण्यात आले.याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावोगावी बैठकांचे आयोजन सुरू असून, काल दि. ०७ गुरुवारी रात्री बीड तालुक्यातील लिंबागणेश व सोमनाथवाडी येथे चावडीवरील बैठका पार पडल्या. या बैठकीत बीडहून आलेले मराठा सेवक युवराज मस्के पाटील, संजय वाघुले, नाना पवार, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी आंदोलनाची रुपरेषा स्पष्ट करत सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित राहावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले. बैठकीस गावचे सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, अशोकराजे वाणी, अक्षय वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, दिनेश जाधव, दत्ता झोडगे, महावीर वाणी, लक्ष्मण आबदार, प्रकाश वायभट, अजय घोलप, बंडु बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

## खा. कल्याण काळे यांच्या प्रयत्नमुळे २० आरोग्य सुविधा केंद्र मंजूर

जालना। प्रतिनिधी

जालना लोकसभा मतदारसंघाच्या आरोग्य सुविधांमध्ये ऐतिहासिक भर घालणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या सातत्यपूर्ण, ठोस आणि परिणामकारक पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाच्या १५व्या वित्त आयोगांतर्गत एकूण २० नवीन आरोग्य सुविधा मंजूर झाल्या आहेत. यामध्ये १८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे व २ तालुका सार्वजनिक आरोग्य कक्षांचा समावेश असून, एकूण ₹११६६.३८ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व सुलभ आरोग्यसेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

डॉ. कल्याण काळे यांनी खासदार झाल्यापासून आपल्या मतदारसंघातील आरोग्य सेवेच्या दर्जाविषयी सरकार दरबारी सातत्याने आवाज उठवला. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आवश्यक प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी प्रस्ताव मागवले असता, डॉ. काळे यांनी स्वतः पुढाकार घेऊन गरजू भागांची माहिती संकलित करून प्रस्ताव पाठवले आणि मंजुरीसाठी पाठपुरावा केला. या प्रयत्नांना यश मिळून आज केंद्र शासनाकडून या प्रस्तावांना मान्यता मिळाल्याचे घोषित करण्यात आले. मंजूर झालेली कामे आणि निधीवाटप (प्रमुख ठिकाणांमध्ये): तालुका सार्वजनिक आरोग्य कक्ष सिल्लोड व फुलंब्री (प्रत्येकी ₹५० लाख) पैठण तालुक्यातील रांजणगाव, बोकुड जळगांव, केकत जळगांव, पारुंडी तांडा, खादगाव, सोमपुरी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे प्रत्येकी ₹६१.१९ लाख अंबड तालुक्यातील कर्जत व हस्तपोखरी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे प्रत्येकी ₹५८.२७ लाख बदनापूर तालुक्यातील चिखली, धोपटेश्वर व नांदखेडा या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे प्रत्येकी ५८.२७ लाख भोकरदन तालुक्यातील सिपोरा बाजार, तांदुळवाडी, सुरंगळी व बरंजळा लोखंडे या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे प्रत्येकी ₹५८.२७ लाख जाफ्राबाद तालुक्यातील आंबेगांव, अकोला देव, आसई या ठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे प्रत्येकी ₹५८.२७ लाख एकूण मंजूर निधी ₹११६६.३८ लाख खासदार डॉ. कल्याण काळे यांचे नेतृत्व मतदारसंघासाठी विकासदृष्ट्या निर्णायक या मान्यतेमुळे केवळ नवीन इमारती उभ्या राहणार नाहीत, तर ग्रामीण भागातील नागरिकांना वेळीच वैद्यकीय सुविधा मिळणार आहेत. या आरोग्य केंद्रांमुळे गावपातळीवर आरोग्य व्यवस्थेचा पाया मजबूत होणार असून, माता-मुलांचे आरोग्य, बालसंगोपन, टिका-करण, आणि प्रसूती सेवा अधिक प्रभावी बनणार आहेत. ही कामगिरी म्हणजे केवळ एक विकास यशकथा नसून, ती खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या लोकहिताशी बांधिलकी, दूरदृष्टी आणि कार्यक्षम नेतृत्वाचे प्रतीक आहे. यामुळेच सर्वसामान्य जनतेपासून ते प्रशासनाच्या वरिष्ठ पातळीपर्यंत सर्वत्र डॉ. काळे यांच्या कार्याची प्रशंसा होत आहे. मी जालना लोकसभा मतदारसंघाच्या प्रत्येक गावात दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवण्यासाठी वचनबद्ध आहे. केंद्र शासनाच्या सहकार्याने हे स्वप्न हळूहळू साकार होत आहे.'' खासदार डॉ. कल्याण काळे आरोग्य सेवेतील हे परिवर्तन म्हणजे मतदारसंघाच्या उज्वल भविष्याची पायाभरणी!


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१७५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०५/०३/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) शकिला मुक्तार सय्यद रा. अंबड सि.स.नं. १४३१ नं.प.मि.नं.९-१२७/२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (९-१२७/२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- रस्ता
पश्चिम : विक्रेत्याचे घर
दक्षिण- खुसरोद्दिन सिद्धीकी यांचे घर
उत्तरः फेरोज यांचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.९ ऑगस्ट २०२५


# वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या व्यावसायिकांवर पोलिसांची कारवाई

## पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांच्या प्रयत्नांमुळे रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

अंबाजोगाई : प्रतिनिधी

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी अंबाजोगाई पोलिसांनी उचललेले पावले आता प्रत्यक्ष कृतीत उतरू लागले आहेत. अंबाजोगाईचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या पुढाकारामुळे मुख्य रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.




बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अलीकडेच अंबाजोगाईत जनसंवाद कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमात शहरातील नागरीकांनी वाहतुकीशी संबंधित अडचणी मांडल्या होत्या. याची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी दोन महिन्यांपासून दुकानासमोरील अतिक्रमण, अनधिकृत वाहनतळ आणि हातगाड्यांवर सूचना देण्याचे सत्र सुरू केले होते.

गुरुवारी (७ ऑगस्ट) शहरातील मुख्य रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या पाच दुकानदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस हवालदार वडकर आणि पोलीस अंमलदार चादर यांनी संयुक्त कारवाई करत सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर कार्यवाही केली.चंदनकुमार यादव, कुरेशी इमरान इब्राहीम, बालाजी भुजंगे, जुनेद शेख आणि जावेद बागवान या दुकानदारांनी रस्त्यावर ◀◀ पान ३ वर

# डॉ.योगेश क्षीरसागरांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने घेतली मुख्याधिकाऱ्यांची भेट

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.८) नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील रस्ते, अस्वच्छता, वीजपुरवठा, पाणीटंचाई तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.



### नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड नगरपरिषदेचे नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे हे नुकतेच रुजू झाले आहेत, त्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

निवेदनात म्हटले की, शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे, बंद पडलेल्या स्ट्रीटलाईट सुरू करणे, नव्या स्ट्रीटलाईट आणि मिनी हायमास्ट बसवणे, चौकाचौकातील लाईट कार्यान्वित करणे, नवीन पोल बसवून एलईडी लाईट बसवणे, पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर करणे, पाईपलाईन लिकेज दुरुस्त करणे तसेच अमृत अटल पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच, स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (नागोबागल्ली), बौद्धविहार दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान आवास घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते वाटप करणे, शहरातील ◀◀ पान ३ वर

# कोहिणी ग्रामपंचायच्या वतीने एक हजार वृक्षरोपण



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात सह संपूर्ण बीड जिल्ह्यात दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणाऱ्या हरित बीड अभियान या महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण उपक्रमासाठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने व आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील कोहिणी ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांनी ग्रामस्थांसमवेत कोहिनी व पाटणच्या परिसरात एक हजार वृक्षारोपण केले.

यावेळी त्यांनी उपक्रमात एका दिवसात तब्बल एक हजार वृक्षांचे रोपण करण्यात आले असून, हा उपक्रम महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या सह महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या

# भाजपच्या बालाघाट परिसराची नूतन कार्यकारिणी जाहीर–अशोक रसाळ



बीड । प्रतिनिधी

लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे, मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या आदेशानुसार भारतीय जनता पार्टी, बालाघाट मंडळ नूतन कार्यकारणी नुकतीच जाहीर झाली.

आज भाजपा कार्यालय बीड येथे जिल्हाध्यक्ष श्री. शंकरजी देशमुख, मंडळ अध्यक्ष अशोक रसाळ व भाजपा पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सलीमभाई जहागीर, चंद्रकांत फड, शांतीनाथ डोरले, अभय वणवे, अजय सवाई, उध्दव रासकर, संतोष हंगे,अमोल वडतिले, ◀◀ पान ३ वर

# विजय लहुरीकर यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

बीड येथील रहिवासी आणि कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथे वास्तव्यास असलेले विजय लहुरीकर यांचे ८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६० वर्षांचे होते.

मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते असे असतानाच शुक्रवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता कोपरगाव येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. गौरेश लहरीकर यांचे ते वडील तर प्रशांत लहुरीकर यांचे ते चुलते होत.विजय लहरीकर यांच्या पश्चात पत्नी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# शहरातील कोणताही घटक विकासापासून वंचित राहणार नाही –अजित दादा पवार

## बीड शहरातील विकासापासून वंचित बहुलभागाचा टप्प्याटप्प्याने विकास

### अजितदादां पवार व आ. विजयसिंह पंडित माध्यमातून होणार –शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

मागील दोन दिवसापासून महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा मा.ना. अजित दादा पवार साहेब बीड नगरीमध्ये होते या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये अनेक शासकीय समारंभात विविध विकास कामांचे सुरुवात मा.अजित दादा पवार यांनी केली बीड शहराला अनेक लोक उपयोगी प्रकल्प उपलब्ध करून दिले व वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन भेटी देऊन त्या क्षेत्रातील समस्या जाणून घेतल्या व पुढील कालावधीमध्ये त्या सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ना.अजित दादा पवार यांनी मांडले सदर दौऱ्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे



शेख निजाम यांनी मा.आ.धनंजय मुंढे,मा.आ.अमरसिंह पंडित, मा.आ.विजयसिंह पंडित याच्या माध्यमातून अल्पसंख्यांक बहुल भागामध्ये अद्याप पणे प्रलंबित असलेल्या मागण्या संदर्भातील निवेदन सादर केले यावेळी मा. ना.अजितदादा पवार यांनी बीड शहरातील खासबाग येथे मोठे मैदान, कंकालेश्वर मंदिर परिसर व हजरत शहंशावली दर्गा परिसर या भागातील पायाभूत सुविधा ,अल्पसंख्यांक बहुल भागातील रस्ते नाल्या व स्वच्छते ◀◀ पान ३ वर

# गेवराई तालुक्यातील लोडशेडींग बंद करा नसता शिवसेना स्टाईलने आंदोलन

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागात सकाळी पाच ते नऊ अशी लोडशेडींग सध्या चालू आहे. यामुळे छोटे, मोठे उद्योग व्यावसायिक , शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच शेतकरी यांना लोडशेडींगचा सामना करावा लागत आहे. तरी गेवराई तालुक्यातील सकाळची लोडशेडींग तात्काळ बंद करा अशी मागणी शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महावितरण कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



गेवराईत शिवसेनेच्या वतीने महावितरण कार्यालयास निवेदन

दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गेवराई महावितरण कार्यालयाच्या वतीने सकाळी ५ ते ९ यादरम्यान दररोज लोडशेडिंग सुरु आहे. तरी ही बाब लक्षात घेता शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख अँड. नारायण शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत निवेदनाद्वारे महावितरण कार्यालयाला सकाळची लोडशेडींग तात्काळ बंद करा अशी मागणी केली आहे .तरी लोडशेडींग बंद न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव मडके, विधानसभा प्रमुख नवनाथ गवते, शहराध्यक्ष मुकेश महाजन ,युवा सेना विधानसभा प्रमुख उमेश शिंदे, व्हीजेएनटी तालुकाप्रमुख बाळासाहेब खेडकर, विजय पवार , सोन्या पाटील उपस्थित होते.

# सामाजिक वनीकरण विभागाच्या उपक्रमाला मोठा प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

''हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र'' या संकल्पनेतून साकारत असलेल्या हरित बीड अभियानाला अंबाजोगाईत मोठ्या उत्साहात आणि जनसहभागातून सुरुवात झाली. सामाजिक वनीकरण विभागाच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते संपन्न झाले.



या कार्यक्रमास अंबाजोगाईतील प्रसिद्ध पक्षीमित्र शंकर कराड यांची विशेष उपस्थिती लाभली. बीड जिल्हा प्रशासनाने ७ ऑगस्ट २०२५ रोजी एकाच दिवशी तब्बल ३० लाख वृक्ष लागवडीचे मोठे उद्दिष्ट ठेवले असून, त्यात अंबाजोगाई तालुक्याचा वाटा ८६ हजार रोपांचा आहे. यामध्ये सामाजिक वनीकरण विभागामार्फत ६६ हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, स्थानिक नागरिकांच्या श्रमदानातून उर्वरित २० हजार रोपे लावण्यात येणार आहेत. ही मोठी मोहीम यशस्वी व्हावी यासाठी विभागीय अधिकारी एस. एल. लखमावाड (सहाय्यक वनसंरक्षक) व यु. एम. बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाईचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. जी. वरवडे यांनी काटेकोर नियोजन आखले आहे. या नियोजनाच्या अंमलबजावणीसाठी वनपाल श्रीमती पी. ए. खरात, एस. व्ही. पाखरे आणि वनरक्षक बी. आर. दहिफळे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

# खासगी वैद्यकीय महाविद्यालयाची शुल्कवाढ थांबवा –बबन आंधळे

बीड । प्रतिनिधी

शुल्क नियमक प्राधिकरणाकडून राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाची एक लाख रुपयांची शुल्क वाढ झालेली आहे विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्यासाठी चार ते साडे चार वर्षाचा कालावधी लागतो खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये हा खर्च ५० लाखाच्या पुढे म्हणजेच ६०–७० लाखापर्यंत जातो आपल्याला जर बाहेरच्या देशामध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण करावयाचे असेल तर हाच खर्च एक कोटीच्या आसपास जातो अनेक वेगवेगळ्या प्रकारचे शुल्क आकारले जातात त्यामध्ये इमारत शुल्क आहे ग्रंथालय शुल्क आहे जिमखाना शुल्क आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होत आहे या रकमेबरोबरच ५० हजार रुपयाची मुदत ठेव देखील विद्यार्थ्याकडून घेतली जाते त्यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती मुदतठेव परत केली जाते परंतु सध्या विद्यार्थ्यांना अडचणीचे होत आहे चांगली गुणवत्ता सिद्ध करूनही विद्यार्थ्यांना या अति सिल्क वाढवल्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेणे शक्य होत नाही आणि त्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहते विनाअनुदानित संस्थांच्या आर्थिक फायद्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने स्वतःच्या नियमाचे उल्लंघन करून राज्यातील खाजगी विना अनुदानित ६९५ संस्थांना शुल्कात नियमबाह्य वाढ करण्याची परवानगी दिल्याचे उघड आले आहे.



# पिंपळनेर येथे गणेश बजगुडे यांच्या हस्ते काँग्रेसच्या शाखेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यात काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी स्वबळाचा नारा देत पक्ष संघटन मजबुत करण्यासाठी गाव तिथे शाखा अभियानाच्या माध्यमातून नव्याने काँग्रेसच्या संघटन बांधणीची सुरुवात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात गाव तिथे शाखा अभियानाच्या माध्यमातून मागील आठवड्यात सुरु केली असुन या अभियानाची सुरुवात बीड



तालुक्यातील मंजेरी हवेली व बाबामिया इनामदार नगर, तेलगाव रोड येथील शाखेचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते करुन केली होती. काल बीड तालुक्यातील पिंपळनेर येथे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नवनाथ थोटे, तालुका उपाध्यक्ष शेख कादर बाबमिया, इंटक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामधन जमले, विद्यार्थी काँग्रेसचे रोहित नवले, भैय्या गोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# माजी उपनगराध्यक्ष भीमराव वाघचौरेंकडून नाट्यगृहाच्या दुरुस्तीची मागणी

बीड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या दोन दिवसीय बीड जिल्हा दौऱ्यात नगर पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष भीमराव वाघचौरे यांनी बीड शहराचे सांस्कृतिक वैभव असणार्या स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची झालेली दुरावस्था पाहता सदरील नाट्यगृहाला पुर्नवैभव प्राप्त करुन देण्यासाठी त्वरीत ७ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा जेणे करुन कला आणि नाट्यप्रेमींना पुन्हा एकदा योग्य वातावरणात कलेचा आस्वाद घेता येईल असे भीमराव वाघचौरे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांना



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात माजी उपनगराध्यक्ष भीमराव वाघचौरे यांनी म्हटले आहे की, बीड शहरातील प्रभाग क्र.१३ मध्ये प्रथम दर्शनी भागात कला व सांस्कृतिक प्रेमी नागरिकांसाठी बीड न.प. मार्फत स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृह उभारलेले असून शहराच्या सांस्कृतिक वैभवाचे ते एक मापदंड आहे. या नाट्यगृहाची सध्या दुरावस्था झालेली असून याबद्दल अनेक नाट्यरसिकांनी जाहिरपणे खंत व्यक्त केलेली आहे. सदरील नाट्यगृह उभारणीसाठी मी या भागाचा नगरसेवक म्हणून खारीचा वाटा उचललेला आहे. चव्हाण नाट्यगृह जिल्ह्यातील कलाप्रेमींसाठी अनेक आठवणींचा समृध्द वारसा ठरलेले आहे. या नाट्यगृहाची दुरुस्तीसाठी म्हणजेच सभागृहाचे ध्वनिक, बांधकाम, स्वच्छता विषयक आवश्यक बाबी, सोलार पॅनल, सीसीटिव्ही, साऊंड सिस्टीमचा विस्तार आणि अखंडीत वीज पुरवठ्यासाठी डिझेल जनरेटर लोडचा १२५ केव्हीए पर्यंतचा विस्तार आदिसाठी ७ कोटी रुपयांचा निधी मंजुर करण्यात यावा जेणे करुन सांस्कृतिक चळवळ अधिक गतीमान होईल अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नगरसेवक तथा माजी उपनगराध्यक्ष भीमराव वाघचौरे यांनी उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली असून या संबंधी लवकरच आपण सकारात्मक निर्णय घेवून नाट्यगृहाला भरघोस निधी देवू असे आश्वासन ना.पवार यांनी दिले.

# तबब्ल २७ वार करून सासऱ्याचा खून; अंबाजोगाई सत्र न्यायालयाने जावयाला ठोठावली जन्मठेपेची शिक्षा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सासऱ्याच्या खूनप्रकरणी जावयाला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असून, हा महत्त्वपूर्ण निकाल अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांनी दिला. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अॅड. लक्ष्मण फड यांनी प्रभावी युक्तिवाद सादर करून आरोपीला दोषी ठरवण्यात निर्णायक भूमिका बजावली.

ही घटना दोन वर्षापूर्वी केंद्रेवाडी (ता. अंबाजोगाई) येथे घडली होती. मृत दत्तात्रय रामा गायके यांची मुलगी रेखा हिचा विवाह रामेश्वर बळीराम गोरे (रा. हिंगणगाव कोथाळा, ता. कळंब, जि. धाराशिव) याच्यासोबत झाला होता. मात्र, लग्न होऊन आठ वर्षांनंतरही दोघांना अपत्य नव्हते. त्यामुळे रामेश्वरने दुसरे लग्न करण्यासाठी पत्नी रेखावर दबाव टाकण्यास सुरुवात केली. त्यासाठी तिच्या वडिलांनी परवानगी द्यावी, असा तगादा तो लावत होता. या कारणावरून तो रेखाला आणि तिच्या कुटुंबाला मानसिक त्रास देत होता.

दरम्यान, मयत दत्तात्रय यांचा मुलगा मल्हारी याचे लग्न ११ जून २०२३ रोजी निश्चित झाले होते. यामुळे आरोपी रामेश्वरच्या मनात राग दाटून गेला होता. दि. ७ जून २०२३ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास तो केंद्रेवाडी येथे आला. यावेळी दत्तात्रय हे शेतातील आखाड्यावर झोपले होते. आरोपीने त्यांच्याबद्दल चौकशी केल्यानंतर रात्रीच्या अंधारात आखाड्यावर गाठले आणि धारदार शस्त्राने तब्बल २७ वार करून त्यांचा निर्घृण खून केला. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात कलम ३०२ भादंवि अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची जबाबदारी सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमार कुमावत यांच्याकडे सोपवण्यात आली. कुमावत यांनी घटनास्थळाचा सखोल तपास करून आरोपीविरुद्ध सबळ पुरावे न्यायालयात सादर केले. सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. यामध्ये शेजारील शेतकरी बंडू गिरी, लक्ष्मण केंद्रे व तपास अधिकारी पंकज कुमावत यांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या. अॅड. लक्ष्मण फड यांनी पुरावे व साक्षीदारांच्या जबाबांवर आधारित प्रभावी युक्तिवाद सादर केला. त्यांच्या युक्तिवादास मा. न्यायालयाने मान्यता देत आरोपी रामेश्वर गोरे याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या खटल्यात अॅड. अनंत तिडके यांनी सरकार पक्षाला सहाय्य केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# सत्ताधारी पक्षाचा बनाव मोर्चाच्या नावाखाली नागरिकांची दिशाभूल

**पिंपरी चिंचवड । सिद्धांत चौधरी**

**सत्ताधारी पक्षाचा बनाव सत्ताधारी मोर्चाच्या नावाखाली नागरिकांची दिशाभूल सत्ताधारी पक्ष आणि प्रशासक यांचा नवटंकीचा अजब कारभार पाहायला पिंपरी चिंचवड मध्ये मिळाला**





विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना डावलणे प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांना नडझेपणारा प्रकार असताना आयुक्तांनी विधानसभेचे उपाध्यक्ष पद भूषवित असलेले अण्णा बनसोडे यांना सुद्धा निवेदन स्वीकारण्याकरता भेटले नाही ही एक उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा अपमान नाही तर विधानसभेतील एका उच्च पदाचा अपमान प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांनी केला आहे

पिंपरी चिंचवड शहरामध्ये दिनांक सात ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या नेतृत्वामध्ये जो प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांनी यांनी गुगल मॅप च्या माध्यमातून प्रारूप आराखडा डीपी तयार केला आहे तो जन माणसांना त्रासदायक ठरणारा असल्याचे सांगत जनआक्रोश मोर्चा शगुन चौक ते पिंपरी चिंचवड महानगरपालिका असा होता या मोर्चामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील अजित पवार गटाचे सर्व प्रमुख नेतेमंडळी उपस्थित होती विशेष करून सत्ताधारी पदाचा उपभोग घेणारे विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे हे देखील उपस्थित राहून भाषण आश्वासन देऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आयुक्तांना मागण्यांचे निवेदन देण्याकरिता गेले असता तिथे त्यांना आयुक्त शेखर सिंह यांनी केराची टोपली दाखवल्याचे दिसून आले तब्बल एक ते दीड तास जर विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पायऱ्यावर ठिय्यामांडून बसावं लागत असेल तर सामान्य अतिसामान्य लोकांचे जनमानसांचे हे प्रशासकीय अधिकारी कर्मचारी किती हाल करत असतील व त्यांना त्रास किती देत असतील हा प्रश्नचिन्हच आहे

सर्वसामान्य जनतेमध्ये एकच सूर ऐकायला मिळतोय प्रशासक आयुक्त शेखर सिंह हे प्रशासनाच्या ताटाखालचे मांजर आहेत असा शिक्का मोर्तब नागरिकानी केला आहे प्रशासक आयुक्त शेखर सिंह यांनी विधानसभेच्या त्या उच्च पदाचा तरी मान राखणं गरजेच होत पण त्यांनी मी एक प्रशासक हि ठाम भूमिका घेतल्याचे दिसून आले यामधून लोकांची नागरिकांची जनतेची दिशाभूल करण्याचे काम सत्ताधारी पक्षाने केली आहे पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सत्ताधारी पक्षातील राष्ट्रवादी अजित पवार गटाने हा काल झालेला जन आक्रोश मोर्चा काढला असल्याचे नागरिकांचे मत आहे

मी मारल्यासारखं करतो तू रडल्यासारखे कर असा खेळ प्रशासन आणि प्रशासक सत्ताधारी पक्षाने केला आहे हे मात्र नक्की.

# पत्नी कमविती असल्याने न्यायालयाने तुर्तास दिली अंतरिम खर्चाला स्थगिती



पुणे - पती-पत्नी दोघेही नोकरी करत आहेत. कमावते आहेत. त्यामुळे पतीला संपूर्ण खर्च भरण्याची सक्ती करण्यात येऊ शकत नाही, असा निष्कर्ष काढत सत्र न्यायाधीश ए.एस. गांधी यांनी पतीला दिलासा दिला आहे. परिणामी, न्यायालयाने पत्नीला देण्यात आलेल्या अंतरिम खर्चाच्या अंमलबजावणीवर अटींसह तात्पुरती स्थगिती दिली आहे.

पतीने पतीविरोधात कौटुंबिक हिंसाचार कायद्यानुसार दावा दाखल केला आहे. यामध्ये प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी ७ नोव्हेंबर २०२४ रोजी पतीला अंतरिम खर्च म्हणून दरमहा ५ हजार रुपये भरण्याचे आदेश दिले होते. याविरोधात पतीने ड. अब्दुलकय्यूम नय्यूम सय्यद आणि ड. आकाश सुधीर चव्हाण यांच्यामार्फत सत्र न्यायालयात अपील दाखल केले.

न्यायालयात दिलेल्या शपथपत्रावरून पत्नी नोकरी करत असल्याचे दिसून येत आहे. यावरून ती आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. त्यामुळे तिला नियमित खर्च देणे अन्यायकारक आहे, असा युक्तीवाद ड. सय्यद आणि ड. चव्हाण यांनी केला.

हा युक्तीवाद न्यायालयाने ग्राह धरत अंतरिम खर्चास तुर्तास स्थगिती दिली आहे. मात्र, नोव्हेंबर महिन्यापासून आतापर्यंतच्या कालावधीतील थकीत खर्चाच्या ५० टक्के रमक्क निकालाच्या १५ दिवसाच्या आत न्यायालयात भरावी लगणार आहे. तसेच, यापुढे दरमहा न्यायालयात ३ हजार रुपये भरावे लागणार आहेत.या निर्णयाने पुरुष देखील पीडित असू शकतात. पुरूषांच्या हक्कांची कायदा दखल घेत असल्याचे न्यायालयाने दाखवून दिले आहे. हा समतेच्या लढ्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.- ॲड. अब्दुलकय्यूम नय्यूम सय्यद



# शिवसेना उपविभाग प्रमुखपदी गिरीश जैवळ यांची नियुक्ती

विश्रांतवाडी - लोहगाव पोरवाल रोड येथील गिरीश भिमराव जैवळ यांनी नुकताच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य करत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला होता. त्यांची वडगावशेरी मतदारसंघाच्या उपविभाग प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे यांच्या हस्ते जैवळ यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

जैवळ हे सध्या लोहगाव पोरवाल रस्त्यावरील प्राईड आशियाना या उच्चभ्रू बहुमजली गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन आहेत. त्याचबरोबर ते धानोरी-लोहगाव रेसिडेन्स असोसिएशनचे अध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. त्या माध्यमातून सोसायटीतील रहिवाशांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी जैवळ हे कायमच प्रयत्नशील असतात.


त्यामुळे त्यांचा या परिसरातील लोकांशी जनसंपर्क दांडगा आहे. त्याचा पक्ष वाढीसाठी नक्कीच फायदा होईल. नियुक्ती पत्र देताना जैवळ यांच्यासमवेत मनोज पांडे, संतोष पाटोळे, धनराज मुगळे, ऋषी पाटोळे यांच्यासह पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.नियुक्तीनंतर बोलताना जैवळ म्हणाले की, वडगावशेरी मतदारसंघात शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करणार आहे. तसेच आगामी काळात येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत लोहगाव-धानोरी भागातून शिवसेनेचा उमेदवार कसा निवडून येईल यासाठी देखील प्रयत्न करणार असल्याचे जैवळ यांनी सांगितले.


त्याचबरोबर पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसाहेब यांनी व महायुती सरकारने राबविलेल्या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे, असेही जैवळ म्हणाले.

# ..तर फाशी द्या, मग जावई का असेना; रुपालीताई चेकाळून बोलल्या, एकनाथ खडसेंचा पलटवार

**जळगाव । प्रतिनिधी**

पुण्यातील फ्लॅटवर झालेल्या रेव्ह पार्टीवरुन राजकीय वातावरण चांगलच तापलं असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर हेही यात अडकले आहेत. पोलिसांनी प्रांजल यांच्यासह चौघांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. तत्पूर्वी या प्रकरणात धक्कादायक आरोप करत एका बहुउद्देशीय संस्थेने महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये प्रांजल खेवलकरांवर गंभीर आरोप केले होते. त्यानंतर, रुपाली चाकणकर यांनी पोलिसांकडून या घटनेचा अहवाल मागवला असता, आज अहवालातील माहिती माध्यमांसमोर दिली. त्यामध्ये, पुण्यातील रेव्ह पार्टी हे मोठं मानवी तस्करीचं रॅकेट असल्याचं सांगत खडसेंच्या जावयावर गंभीर आरोपही त्यांनी केले आहेत. त्यावर, आता रोहिणी खडसेंचे वडिल आणि आमदार एकनाथ खडसेंनी पलटवार केला. दोषी असेल तर फाशी द्या, मग जावई का असेना असेही खडसेंनी म्हटले.





रुपाली चाकणकर या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष आहेत, त्या एखाद्या पोलिस अधिकाऱ्याप्रमाणे बोलत आहेत. विशेष म्हणजे त्या जी माहिती सांगत आहेत, वास्तविक पाहता ती पोलिसांनी सांगायला पाहिजे रोहिणी खडसे आणि त्यांचे मैत्रीचे संबंध कसे आहेत हे सगळ्यांना माहीत आहे. त्यामुळे, चाकणकर या चेकाळून बोलत आहेत, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि आरोपी प्रांजल खेवलकरांचे सासरे एकनाथ खडसेंनी रुपाली चाकणकर यांच्या पत्रकार परिषदेवरुन पलटवार केला. तसेच, एखादी खासगी माहिती ते अशाप्रकारे कशी सार्वजनिक करू शकतात, ती गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी करणे योग्य आहे, असेही खडसेंनी म्हटले.

आपण आपल्या जावयाची बाजू घेणार नाही, दोषी असेल तर त्याला फाशी द्यायला हवी, हा मात्र बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. एकाही मुलीची त्याच्या विरोधात तक्रार नाही, खासगी आयुष्य आहे, एसआयटी पेक्षा केंद्राच्या एखाद्या तपास यंत्रणाद्वारे तपास केला जावा. सीबीआकडून या प्रकरणाचा तपासा करावा, असेही खडसेंनी एसआयटी स्थापनेसंदर्भाने म्हटले. तर, रुपालीताईंनी लोढा प्रकरणातही लक्ष घालावे, अशी मागणी एकनाथ खडसे यांनी रुपाली चाकणकरांकडे केली. याशिवाय अधिकचे बोलणे टाळले. दरम्यान, रुपाली चाकणकरांचे आरोप हे राजकीय द्वेषातून असल्याचे नाथाभाऊंनी सूचवलं आहे.

## काय म्हणाल्या चाकणकर

राज्य महिला आयोगाच्या वतीने पुणे पोलिसांना सूचना दिल्या होत्या, त्यानुसार सानवी संस्थेचा अहवाल आज प्राप्त झाला आहे. भीषण आणि भयावह अहवाल आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील खराडीत छापा टाकत कारवाई करण्यात आली होती. प्रांजल खेवलकर आणि त्यांचा सहकाऱ्यांना ताब्यात घेऊन कोकेन गांजा, १० मोबाईल, हुक्का पॉट आणि अमली पदार्थ पोलिसांनी जप्त केले होते. हडपसरच्या घरातून जप्त केलेल्या मोबाईलमध्ये हिडन फोल्डरमध्ये नग्न फोटो आणि व्हिडिओ आढळले होते. आरुष नावाने हा नंबर सेव्ह होता, अशी खळबळजनक माहिती रुपाली चाकणकर यांनी दिली आहे.


## पिच्चरमध्ये काम देतो म्हणत मुलींना बोलावलं

लोणावळा येथे सगळ्यांना बोलण्यात आलं होत, प्रांजल यांनी मुलींना पिच्चरमध्ये काम देतो म्हणून बोलवले आहे. गोवा, लोणावळा, साकिनाका, जळगाव या ठिकाणी बोलवल्याचं पोलिसांच्या तपासातून समोर आलं आहे. या मुलींसोबत लैगिक अत्याचार झाल्याचं समोर आलं असून अनैतिक मानवी तस्करीचे रॅकेट असण्याची शक्यताही रुपाली चाकणकर यांनी वर्तवली आहे.

# पुण्यासाठी ५ नवीन पोलीस ठाण्यांना लवकरच मान्यता : मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

**पुणे शहराच्या वाढत्या विस्तारासोबत कायदा व सुव्यवस्था सुदृढ ठेवण्यासाठी राज्य शासनाचा विशेष भर आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले.**



मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले की, ६० वर्षांनंतर पोलीस दलाचा नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. यामध्ये आधुनिक पोलीस ठाण्यांची रचना, नार्कोटिक्स आणि फॉरेन्सिक युनिट्स यांचा समावेश आहे. लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी व येवलेवाडी येथे नवीन पोलीस ठाण्यांच्या स्थापनेस लवकरच मंजुरी दिली जाईल. त्यासाठी एक हजार नवीन मनुष्यबळाचीही भर घालण्यात येईल.

उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर: उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त अमितेश कुमार व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुण्याच्या सुरक्षेसाठी आधुनिक पावले

शहरात अत्याधुनिक 'दृष्टी' इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर, ड्रोन सुविधा, मोबाईल सर्व्हिलन्स व्हॅन, तसेच सीसीटीव्हीच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ झाला. बोपदेव घाटासह शहरातील २२ टेकड्यांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून निगराणी ठेवण्यात येणार आहे. गर्दीच्या ठिकाणी पब्लिक ड्रेस सिस्टीम आणि २४७ नियंत्रणासाठी पाच मोबाईल कंट्रोल युनिट्सही उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

# मुलगी असो वा मुलगा, दोन वर थांबायला शिका! लोकसंख्या वाढीवर अजित पवारांचं विधान

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी लोकसंख्या वाढीच्या मुद्यावर भाष्य करताना विधान केलं आहे. पुण्यात आयोजित कार्यक्रमात बोलना पवार यांनी वैयक्तिक अनुभवाचा उल्लेख करत लोकसंख्या वाढीसंदर्भात भाष्य केलं आहे.



मी एका भगिनीला विचारलं एक मुलगी इथे आहे दुसरी मुलगी कुठे आहे ? ती म्हणाली घरी ठेवली आहे, आई कडे दोन मुली असताना ती गरोदर दिसली. हे विचारल्यावर ती म्हणाली आहे पोटात मी म्हणालो आता बास करामी विचारलं किती आहेत मुले? ती म्हणाली तीन आहेत. आता चौथे काय होईल माहिती नाही. आता तुम्ही मला सांगा वरून ब्रम्ह देव जरी आला लोकसंख्या वाढीचा कार्यक्रम आपण व्यवस्थेत पार पडायच ठरवलं तर तुम्ही पण सरकारमध्ये प्रमुख झाला तर ते अशक्य गोष्ट आहे, असं अजित पवार म्हणाले.

काळजी घेण्याचे केलं आवाहन

प्रत्येकानी आपल्या स्तरावर काळजी घेतली पाहिजे. कुणी चुकत असेल, तर त्याला सांगायला पाहिजे. अरे बाबा मुलगी असो किंवा मुलगा दोन वर थांबायला शिका, असा सल्ला अजित पवारांनी यावेळी बोलताना दिला. आम्ही सगळ्यांसाठी कायदा केला नाही, मात्र नगरपालिका, महानगरपालिका जिल्हा परिषद पंचायत इथपर्यंतचे कायदे केले आहेत. लोक म्हणतात आम्हाला कायदा केला आहे, खासदार आमदारांना कायदा केला नाही, ते आमच्या हातात नाही, नाहीतर तिथे ही दोन अपत्याच्यावर अपत्ये असतील, तर त्याला उभे राहता येणार नाही. अशा पद्धतीचा कायदा केला असता, असं त्यांनी सांगितलं. पण ते आम्हाला जमले नाही. पुढे कधी हातात आले तर त्याचा विचार करू, असे देखील यावेळी बोलताना सांगितले.

# टेम्पोमधून पॉपकॉर्नचा माल लंपास; अज्ञात चोरट्याविरोधात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

शिरूर : शिरूर शहरातील बाबुरावनगर भागात उभ्या असलेल्या टेम्पोमधून अज्ञात चोरट्याने तब्बल ५३ हजार ५३२ रुपयांचा पॉपकॉर्नचा साठा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.




या प्रकरणी फिर्यादी दत्तात्रय भाउसाहेब देवकर (वय३१ वर्ष ) व्यवसाय - चालक, रा. चांडोली गाव, ता. खेड, जि. पुणे यांनी शिरूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून, ही चोरी ६ ऑगस्ट रोजी रात्री १०:३० ते ७ ऑगस्ट सकाळी ५:१० या वेळेत घडल्याचे निदर्शनात आले आहे.

शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक लेलँड टेम्पो एम एच१४जे पी ६७८६ हा टेम्पो शिरूर शहरातील कोळपे हॉस्पिटलजवळ, बाबुरावनगर येथे लावलेला होता. त्या टेम्पोमधून अज्ञात चोराने १५ सिलबंद गोण्या प्रत्येकी ३० किलो वजन आणि १४किलो वजनाचा बॉक्स असा एकूण ४६४किलो वजनाचा पॉपकॉर्न माल चोरून नेला आहे.

या पॉपकॉर्न मालाची एकूण किंमत ५३ हजार ५३२ रुपये असून, प्रत्येक गोणीवर स्वतंत्र किंमत नमूद केले होती. याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शकाखाली पुढील तपास पोलीस हवालदार भगत हे करत आहेत.

# राज्यमंत्री बोर्डीकर यांच्या वक्तव्याचा खालापूरमध्ये निषेध

खालापूर । प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. एका कार्यक्रमादरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्याला जाहीर सभेत कानाखाली मारण्याची धमकी दिल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा निषेध करत खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने एकत्र येत या गटनेचा निषेध व्यक्त केला. सोमवारी (दि. ४) खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांना निवेदन सादर केले.



जिंतूर तालूक्यातील बोरी येथील लाभार्थी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी राज्यमंत्री बोर्डीकर यांनी एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरोधात अवमानकारक, असभ्य आणि धमकीच्या स्वरूपाचे वक्तव्य केल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या वतीने सोमवारी (दि. ४) राज्यभर काळी फित लावून कामबंद आंदोलन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून खालापूरमधील अधिकाऱ्यांनीही तीव्र निषेध व्यक्त करत, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या विरोधात योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद पाटील, प्रशांत कदम, संदीप धारणे, महेश म्हसे, परेश नागरे, वैभव पाटील, आकाश पाटील, सुहास वारे, निलेश म्हसकर, प्रवीण पेमारे, गणेश मोरे, प्रमोद काळे, पंकज जाधव, योगेश पाटील, सुरज मुकादम, विश्वास वारे, स्नेहल गोसलकर, मंगला केदारे आदी प्रमुखांसह मोठ्या संख्येने खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान आवास योजना अंतर्गत महाराष्ट्रातील ग्रामपंचायत अधिकारी अत्यंत प्रामाणिक व निष्ठेने काम करत आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनामार्फत या योजनेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मान प्राप्त झाला आहे. मात्र मंत्री महोदय ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना अवमानकारक वागणुक देतात. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा अपमान करणाऱ्या मंत्री महोदयांवर कारवाई झालीच पाहिजे.

- प्रमोद पाटील, ग्रामपंचायत अधिकारी